CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ८ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक २४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे जलवाहतुकीचा नवा अध्याय ; मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक गरजांसाठी शाश्र्वत आणि पर्यावरणपूरक जलवाहतूक व्यवस्था उभारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे देशात आधुनिक जलवाहतुकीचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेस्थित मे. हायके एएस या सागरी तंत्रज्ञान कंपनीदरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी आधुनिक जलयाने उपलब्ध करून देणे तसेच महाराष्ट्रात जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार (गुंतवणूक आणि धोरण) कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., नॉर्वेच्या मानद कॉन्सुल जनरल मोनिका नागेलगार्ड, स्वीडनचे कॉन्सुल जनरल स्वेन ऑस्टरबर्ग, हायकेचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स आदी उपस्थित होते. या सामंजस्य करारावर महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. आणि नॉर्वेच्या मे. हायके एएसचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स यांनी स्वाक्षरी केली.वर्षा निवासस्थानी हा करार झाल्यानंतर उपस्थितांना संबोधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून शाश्र्वत जलवाहतुकीच्या संकल्पनेवर राज्य शासनाचे सातत्याने काम सुरू आहे. मुंबईत जलवाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचा संपूर्ण आराखडा आता तयार झाला असून, त्यासाठी आधुनिक आणि शाश्र्वत नौकांची आवश्यकता होती. मुंबईसारख्या महानगरात जलमार्गांचा प्रभावी वापर केल्यास वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. देशभरात जलवाहतुकीसाठी मोठ्या संधी उपलब्ध असून, आगामी काळात शाश्र्वत वॉटर ट्रान्सपोर्टची मागणी झपाट्याने वाढणार आहे. मुंबईत सुरू होत असलेली ही संकल्पना देशातील इतर शहरांसाठीही मार्गदर्शक ठरेल.या प्रकल्पासाठी सहकार्य करणाऱ्या नॉर्वेच्या मे. हायके एएस यांच्यासह अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. विशेषत: या उपक्रमासाठी सर्वांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, संबंधित अधिकारी आणि भागीदार संस्थांचेही मुख्यमंत्री यांनी कौतुक केले.



यावेळी मस्त्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले, मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्प हा राज्याच्या सागरी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मे. हायके एएस यासारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीसोबत होणारा हा करार महाराष्ट्रातील बंदर विकास, जहाजबांधणी आणि सागरी कौशल्यविकासासाठी नवी दिशा देणारा ठरेल. भविष्यात जलवाहतूक अधिक सुरक्षित, आधुनिक आणि प्रवासी–अनुकूल करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असे मंत्री राणे यावेळी म्हणाले

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी गुड न्यूज!
### वेतन श्रेणी एकत्रीकरणाचा प्रस्ताव, पदोन्नती मिळणार

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या ८ व्या वेतन आयोगाबाबत सुरू असलेली चर्चा आता थांबली असून, प्रत्यक्ष हालचालींना वेग आला आहे. आता ७० वर्षांची जुनी वेतन रचना बदलण्याची तयारी सुरू आहे. कर्मचारी संघटनांनी (छउगउच्) सरकारसमोर एक महत्त्वाचा प्रस्ताव मांडला आहे. ज्यामध्ये विविध वेतन श्रेणींचे एकत्रीकरण करण्याची मागणी केली आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास कर्मचाऱ्यांच्या पगारात आणि पदोन्नतीमध्येही वाढ होईल.सध्याच्या ७ व्या वेतन आयोगातील सुरुवातीच्या६ वेतन श्रेणींना एकत्र करूनकेवळ ३ शक्तिशाली श्रेणी तयार करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे कनिष्ठ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची प्रगती अधिक वेगाने होण्यास मदत होईल.पदोन्नतीमध्ये वेगाने वाढ सध्या श्रेणी–१ वरून श्रेणी–६ पर्यंत पोहोचण्यासाठी कर्मचाऱ्याला १५ ते २० वर्षे कार्यरत असणे आणि ४ ते ५ प्रमोशन मिळणे आवश्यक असते. मात्र, श्रेणींची संख्या कमी झाल्यास कर्मचाऱ्यांचा करिअर प्रवास सुखकर होईल. यामुळे केवळ पगारच वाढणार नाही, तर निवृत्तीनंतर मिळणारी पेन्शन आणि ग्रॅच्युइटीमध्येही मोठी वाढ पाहायला मिळेल.प्रस्तावित बदल कसे असतील? नवीन श्रेणी––: सध्याच्या श्रेणी–१ आणि श्रेणी–२ चे एकत्रीकरण. (१८ हजारांचा बेस संपवून किमान वेतन वाढवणे).नवीन श्रेणी–इ: सध्याच्या स्तर–३ आणि स्तर–४ चे एकत्रीकरण. (मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ).नवीन श्रेणी–उ: सध्याच्या स्तर–५ आणि स्तर–६ चे एकत्रीकरण. (करिअर ग्राफला नवी उंची).या एकत्रीकरणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, जेव्हा दोन श्रेणी एकत्र येतात, तेव्हा पगार नेहमी वरच्या श्रेणीच्या प्रमाणानुसार ठरवला जातो. उदारणार्थ, श्रेणी–१ चे किमान वेतन १८ हजार रुपये आहे, तर श्रेणी–२ चे १९ हजार रुपये. एकत्रीकरणानंतर श्रेणी–१ मधील कर्मचाऱ्याचा मूळ पगार थेट १९ हजार ९०० रुपये आणिफिटमेंट फॅक्टरनुसार त्याहून अधिक होईल. याचा फायदा एमटीएस, क्लर्क आणि ग्रुप–सी कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

## आता शाळांमधून थेट'NASA' आणि 'ISRO' गाठता येणार!
### 'मुख्यमंत्री विज्ञान वारी' सुरू

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी, प्रयोगातून शिकण्याची सवय लागावी आणि 'विज्ञान म्हणजे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नाही' हे उमगावे, यासाठी नव्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात ' मुख्यमंत्री विज्ञान वारी ' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू होणार आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना थेट 'नासा' आणि 'इस्रो' यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार असल्याने शालेय स्तरावरच विज्ञानाच्या नव्या क्षितिजांची ओळख होणार आहे.

राज्यात दरवर्षी होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनांना आता 'विज्ञान वारी'ची जोड मिळणार आहे. तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन टप्प्यांतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विज्ञान अनुभवण्याची संधी दिली जाणार आहे. यामुळे स्पर्धा आणि अनुभव या दोन्ही गोष्टींचा संगम साधत विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत तालुका स्तरावर अव्वल ठरलेल्या सुमारे दोन हजार १४८ विद्यार्थ्यांना राज्यातील विविध सायन्स सेंटरना भेट देण्याची संधी मिळेल. त्यानंतर जिल्हा स्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील 'इस्रो' केंद्र पाहता येणार आहे. राज्य स्तरावर चमकदार कामगिरी करणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेतील 'नासा' केंद्राची विशेष भेट आयोजित करण्यात येणार आहे. अशा प्रकारे विज्ञान प्रदर्शनातून थेट अंतराळ संशोधन संस्थांपर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांसाठी खुला केला जाणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या पार्श्र्वभूमीवर हा उपक्रम राबवण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. डिजिटल साधने, कृत्रिम प्रज्ञा आणि प्रयोगाधारित शिक्षणाच्या माध्यमातून 'शिकणे' अधिक रंजक आणि अनुभवाधारित करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून येत आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधील सुप्त वैज्ञानिक गुणांना वाव देण्यासाठी सरकारने 'मुख्यमंत्री विज्ञान वारी'चा श्रीगणेशा केला आहे. विज्ञानाच्या प्रयोगांपासून ते अंतराळ संशोधनापर्यंतचा प्रवास या उपक्रमामुळे सुकर होणार आहे.

## इराण–अमेरिका चर्चेत प्रगती, लवकरच शस्त्रसंधी करार होण्याची शक्यता

**वृत्तसंस्था तेहरान :** पश्चिम आशियातील सुरू असलेला तणाव आणि संकट संपवण्यासाठी इराण आणि अमेरिका यांच्यातील चर्चेत मोठी प्रगती होत असल्याचे दिसून येत आहे. अहवालानुसार, प्रादेशिक संकटावर तोडगा काढण्यासाठी आणि तणाव पूर्णपणे कमी करण्याच्या उद्देशाने अमेरिकेने दिलेल्या प्रस्तावावर इराण गुरुवारी मध्यस्थ देशांमार्फत आपले उत्तर देऊ शकतो.सूत्रांच्या माहितीनुसार, तेहरान अजूनही अमेरिकेच्या पाठिंब्याच्या प्रस्तावाचा आढावा घेत आहे. मात्र, दोन्ही देश संभाव्य कराराच्या खूप जवळ पोहोचल्याचे दिसत आहे. वॉशिंग्टन आणि तेहरान यांच्यातील सुरू असलेली चर्चा प्राथमिक कराराच्या दिशेने पुढे सरकत असून, त्यामुळे सध्याचे संकट टाळण्यास आणि व्यापक अणुकरार चर्चेचा मार्ग मोकळा होण्यास मदत होऊ शकते. अहवालानुसार, अमेरिकन अधिकारी आणि चर्चेशी संबंधित सूत्रांनी याला संघर्ष सुरू झाल्यानंतरचा सर्वात मोठा राजनैतिक घडामोडींपैकी एक म्हटले आहे. अंतिम करार अद्याप झालेला नसला तरी चर्चा सकारात्मक दिशेने सुरू असल्याचे सांगितले जात आहे.अहवालानुसार, प्रस्तावित करार हा १४ मुद्द्यांच्या एका पानाच्या सामंजस्य करारावर (मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग) आधारित आहे. याचा उद्देश तात्काळ युद्धविराम लागू करणे आणि पुढील ३० दिवसांत व्यापक करारासाठी चर्चा सुरू करणे हा आहे.या प्रस्तावानुसार, इराण तात्पुरत्या स्वरूपात आपला अणु संवर्धन कार्यक्रम थांबवू शकतो. त्याच्या बदल्यात अमेरिका इराणवरील काही निर्बंध हटवण्याची आणि इराणी मालमत्तांमध्ये अडकलेले अब्जावधी डॉलर मुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करेल. तसेच, होर्मुज सामुद्रधुनीतील तणाव कमी करण्यासाठी आणि समुद्री वाहतूक सुरळीत करण्यासाठी दोन्ही देश प्रयत्न करतील.मात्र, अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, करारातील अनेक अटी पुढील चर्चेच्या निष्कर्षांवर अवलंबून असतील. त्यामुळे भविष्यात पुन्हा तणाव वाढण्याची किंवा दीर्घकाळ अनिश्र्चितता कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच होर्मुज सामुद्रधुनीतील लष्करी हालचाली कमी करण्याचा निर्णय या राजनैतिक प्रगतीच्या पार्श्र्वभूमीवर घेतला होता. या संपूर्ण राजनैतिक प्रक्रियेचे नेतृत्व अमेरिकेचे दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जॅरेड कुशनर करत आहेत. ते थेट संपर्क आणि तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्थांच्या माध्यमातून तेहरानशी चर्चा करत असल्याचे सांगितले जात आहे. जर हा करार औपचारिक स्वरूपात झाला, तर त्याला अधिकृत युद्धसमाप्तीची घोषणा मानले जाईल. तसेच तांत्रिक आणि अणु विषयांवरील पुढील चर्चा इस्लामाबाद किंवा जिनिव्हा येथे होऊ शकते.



## औषधांसाठीही पाकिस्तानची भारताकडे हात पसरण्याची वेळ

**वृत्तसंस्था**

**इस्लामाबाद :** दहशतवादाला शह देणाऱ्या पाकिस्तानचे पाणी तर भारताने बंद केलेच होते, आता व्यापारी पातळीवरही त्यांची कोंडी करून सोडली आहे. २०२५ साली पहलगाममध्ये घडलेल्या हृदयद्रावक घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानमधील द्विपक्षीय व्यापार आता जवळपास पूर्णपणे संपत आला आहे. भारताने पाकिस्तानकडून होणाऱ्या आयातीवर पूर्णपणे बंदी घातली असली, तरी औषधांसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालासाठी पाकिस्तानला आजही भारतापुढे हात पसरावे लाग असल्याचे धक्कादायक आणि पाकिस्तानसाठी लज्जास्पद असलेले वास्तव समोर आले आहे. २०१८ मध्ये भारत आणि पाकिस्तानमधील व्यापाराचा आकडा २.४१ अब्ज डॉलर इतका होता. मात्र, २०२४ पर्यंत तो १.२ अब्ज डॉलरवर घसरला आणि आता भारताने पाकिस्तानवर लादलेल्या कडक निर्बंधांमुळे हा आकडा जवळजवळ शून्यातच जमा झाला आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानेअटारी–वाघा बॉर्डरवरील व्यापार टाळेबंदकेले. त्यानंतर २ मे २०२५ रोजी परकीय व्यापार महासंचालनालयाने (उऋढ) पाकिस्तानकडून होणाऱ्या आयातीवर अधिकृतपणे बंदी घातली.ट बँक ऑफ पाकिस्तानच्या आकडेवारीनुसार, जुलै ते सप्टेंबर २०२५ या काळात पाकिस्तानने भारताकडून ३६.६ दशलक्ष डॉलरचा माल आयात केला. धक्कादायक बाब म्हणजे, यामध्ये केवळ औषध निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाचा समावेश होता. पाकिस्तानला त्यांच्या देशातील रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी माणुसकीच्या भावनेने देण्यात आलेल्या सवलतींतर्गत हा माल आयात करावा लागला आहे. औषधांच्या टंचाईमुळे पाकिस्तानचा फार्मा उद्योग सध्या मातीत मिळण्याच्या स्थितीत असल्याचे दिसत आहे.भारत आणि पाकिस्तानमधील व्यापार थेटपणे बंद असला तरी, पाकिस्तान युएई (ण–ए) आणि सिंगापूरसारख्या देशांमार्फत भारताकडून औषधे खरेदी करण्यासाठी धडपडत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या देशांमार्फत सुमारे १० अब्ज डॉलर्सचा व्यवहार होत आहे. मात्र, दुसऱ्या देशांकडून हा माल खरेदी करताना पाकिस्तानच्या खर्चात अधिक वाढ होत आहे. ज्यामुळे तिथल्या औषधांची किंमत गगनाला भिडली आहे. सिंधू नदीचे पाणी बंद केल्यानंतर आता व्यापारही बंद करून भारताने पाकिस्तानची पळता भुई थोडी करून सोडली आहे. तसेच केवळ औषधेच नव्हे, तर कापूस, पोला, सिमेंट आणि खाद्यपदार्थांसाठीही पाकिस्तान भारतावरच अवलंबून होता. भारताने लादलेल्या बंदीमुळे पाकिस्तानच्या औद्योगिक क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. दुसरीकडे, भारताला होणारी पाकिस्तानी निर्यात २०१९ मधील ५४७.५ दशलक्ष डॉलरवरून २०२४ मध्ये अवघ्या ४ लाख ८० हजार डॉलरवर आली आहे.भारताने पाकिस्तानी व्यापारी करार पूर्णपणे तोडलाआहे.




## जन्मठेपेच्या कैद्यावर जडला महिला जेलरचा जीव..
### बजरंग दलाने केलं कन्यादान!

**वृत्तसंस्था**

**छतरपूर :** प्रेमाला सीमा नसते आणि त्याला कसलीच बंधने नसतात, याची प्रचिती देणारी एक अनोखी प्रेमगाथा मध्य प्रदेशात पाहायला मिळाली आहे. सतना येथील केंद्रीय कारागृहात कार्यरत असलेल्या सहायक जेल अधीक्षक फिरोझा खातून आणि जन्मठेपेची शिक्षा भोगून बाहेर पडलेला कैदी धर्मेंद्र सिंह यांनी लग्नगाठ बांधली आहे. हिंदू रितीरिवाजांनुसार पार पडलेल्या या विवाहाची सध्या संपूर्ण देशात चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छतरपूर जिल्ह्यातील चंदला येथील रहिवासी असलेला धर्मेंद्र सिंह हा हत्येच्या एका प्रकरणात सतना येथील मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. याच कारागृहात फिरोझा खातून या सहायक जेल अधीक्षक (वारंट इंचार्ज) म्हणून कार्यरत होत्या. कारागृहातील कामकाजादरम्यान धर्मेंद्र हा वारंट विभागात मदतनीस म्हणून काम करत असे. कामाच्या निमित्ताने दोघांमध्ये संवाद सुरू झाला आणि या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. काही काळानंतर या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि दोघांनीही समाज व धर्माची पर्वा न करता आयुष्यभर एकमेकांची साथ देण्याचा निर्णय घेतला.

धर्मेंद्रची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर या जोडप्याने विवाह करण्याचा संकल्प केला. मात्र, या आंतरधर्मीय विवाहास फिरोझा यांच्या कुटुंबीयांचा तीव्र विरोध होता. कुटुंबीयांनी या विवाहास नकार देत पाठ फिरवली. अशा परिस्थितीत सतना येथील बजरंग दलाचे कार्यकर्ते त्यांच्या मदतीला धावून आले. छतरपूर जिल्ह्यातील लवकुशनगर येथे हिंदू वैदिक पद्धतीनुसार आणि मंत्रोच्चारांच्या घोषात हा विवाह सोहळा पार पडला. फिरोझा यांच्या कुटुंबातील कोणीही उपस्थित नसल्याने, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन फिरोझा यांचे कन्यादान केले आणि एका भावाप्रमाणे सर्व विधी पार पाडले.

## राजकारण तापलं! तमिळनाडूत पुन्हा निवडणुका होणार?

**वृत्तसंस्था**

चेन्नई : तमिळनाडूमधील सत्तासंघर्ष दिवसेंदिवस अधिकच रंगत चालला असून अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षासमोर बहुमताचा मोठा पेच उभा राहिला आहे. विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आल्यानंतरही सरकार स्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ अद्याप विजय यांच्या बाजूने स्पष्टपणे दिसत नाही. या पार्श्र्वभूमीवर राज्यात आता 'रिसॉर्ट पॉलिटिक्स'लाही सुरुवात झाल्याची चर्चा आहे. अण्णा द्रमुकच्या काही आमदारांना एका खासगी रिसॉर्टमध्ये हलवण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर तमिळनाडूच्या राजकारणात तणाव वाढला आहे. संभाव्य फोडाफोडीपासून आमदारांना दूर ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणीदरम्यान, नजकज चे प्रमुख श्रीधर वेंबू यांनीही या घडामोडींवर प्रतिक्रिया देत राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर मत व्यक्त करताना म्हटलं की, विजय यांना पाठिंबा देणाऱ्या आमदारांची संख्या वाढताना दिसत नाही. या परिस्थितीत जे सरकार अस्तित्वात येईल ते स्थिर राहील, याची खात्री नाही. तमिळनाडूला अधिक सक्षम पर्यायाची गरज आहे. त्यामुळे राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करून पुन्हा निवडणुका घेणं हाच योग्य मार्ग आहे.यासोबतच त्यांनी निवडणुकांमध्ये पैशांच्या प्रभावावरही टीका केली. पुढील निवडणुकांमध्ये पैशांचं वाटप रोखण्यासाठी कठोर उपाययोजना झाल्या पाहिजेत. त्यानंतरच जनतेचा खरा कौल कोणाच्या बाजूने आहे, हे स्पष्ट होईल, असंही त्यांनी नमूद केलं.दुसरीकडे व्हीसीकेचे प्रमुख थोल तिरुमावलवन यांनी विजय यांच्या बाजूने भूमिका घेत राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापनेसाठी तातडीने निमंत्रण द्यावं, अशी मागणी केली आहे. त्यांनी म्हटलं की, राज्यपालांना आधीच ११८ आमदारांचं समर्थनपत्र मागण्याचा अधिकार नाही. जनतेने टीव्हीकेला सर्वात मोठा पक्ष बनवलं आहे. त्यामुळे प्रथम विजय यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यावी आणि त्यानंतर विधानसभेत बहुमत सिद्ध करावं.थोल तिरुमावलवन यांनी पुढे असंही स्पष्ट केलं की, विजय यांनी धर्मनिरपेक्ष सरकार स्थापनेसाठी व्हीसीके आणि डाव्या पक्षांचा पाठिंबा मागितला आहे. याबाबत पक्षांतर्गत चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल. मात्र, जनतेचा कौल लक्षात घेता विजय यांनी सरकार स्थापनेची संधी मिळवलीच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.तमिळनाडूमध्ये आता पुढील काही दिवस अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. विजय यांना आवश्यक संख्याबळ मिळतं का, कोणते पक्ष त्यांच्या पाठीशी उभे राहतात आणि राज्यपाल काय भूमिका घेतात, यावर राज्यातील सत्तासमीकरण ठरणार आहे.

### धुळीचे वादळ

**कल्याण :** निसर्गामध्ये अचानक झालेल्या बदलांमुळे दिवा, डोंबिवली, कल्याण, मलंगगड परिसर आणि ग्रामीण भागात चारच्या सुमारस धुळीचे वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरावर पसरलेल्या या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता ही मोठ्या प्रमाणात खालावल्याचे बोलले जात आहे. असेच धुळीचे वादळ मागच्या आणि त्याच्या मागच्यावर्षी सुद्धा आले होते.

### जयच्या वक्तव्याने चर्चेला उधाण

**बारामती :** सर्वच बारामतीकरांची एक इच्छा होती की दादांना एकदा मुख्यमंत्री म्हणून पाहायला मिळावं. आता वहिनीही त्याच पद्धतीने कष्ट घेत आहेत. २०२९ मध्ये वहिनीच पुढे येतील आणि त्यांना मुख्यमंत्री बनून ती जागा मिळवावी, अशी आमच्या सर्वांची आशा आहे, असे मोठे विधान जय पवार यांनी बारामतीत केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

### बावनकुळे – राज भेट

**मुंबई :** राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी भेट घेतली. या दोन नेत्यांच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असले, तरी ही केवळ एक 'सदिच्छा भेट' होती, असा दावा बावनकुळे यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेला विजय आणि त्यानंतर मंत्रिमंडळात वर्णी लागल्यानंतर बावनकुळे आणि राज ठाकरे यांच्यात काही वेळा दूरध्वनीवरून चर्चा झाली होती. त्यावेळी राज ठाकरे यांच्याकडे चहा पिण्यासाठी येण्याचे बावनकुळे यांनी कबूल केले होते. त्यानुसार गुरुवारी राज ठाकरे यांनी वेळ दिल्याने ही भेट घेतल्याचे महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### बॅकवॉटर महोत्सव

**सातारा :** डिसेंबरमध्ये महाराष्ट्र भव्य कोयना बॅकवॉटर महोत्सव २०२६ चे आयोजन करणार, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. साताऱ्याला जागतिक मान्यता मिळवून देणार असल्याचे वचन त्यांनी दिली.

### राज्यसभेसाठी भुजबळ इच्छुक नाहीत

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर राज्यसभेचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवरून पक्षात चढाओढ सुरू असतानाच, ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) यांनी या शर्यतीतून स्वत:ला दूर ठेवले आहे. मी सध्या राज्यात ज्येष्ठ मंत्री म्हणून काम पाहत असून राज्यसभेवर जाण्यासाठी माझा कोणताही आग्रह नाही, असे त्यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

### मुद्रा योजनेचा फायदा

**मुंबई :** स्वतःचा व्यवसाय असावा हे अनेकांचं स्वप्न असतं, इच्छाशक्ती असली तरी खिशात पैसे नसतात त्यामुळे अनेकांना याचा फटका बसतो. तुम्हांला देखील व्यवसायातून स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर प्रधानमंत्री मुद्रा योजना ही तुमच्या मोठ्या फायद्याची ठरू शकते. अनेकांनी या केंद्र सरकारच्या योजनेचा फायदा घेतला असून व्यावसाय क्षेत्रात स्वतःचे नाव कमावले आ

### पेन्शन योजनेत बदल

**मुंबई :**उतारवयात आधार असतो तो केवळ आपल्या माणसाचा आणि आपल्या पेन्शनच्या पैशांचा,सरकारी नोकरीत आपली सेवा बजावणाऱ्यांसाठी, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारने एक योजना जाहीर केली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन सेवा निवडण्याचा पर्याय दिला आहे. १० आणि २० वर्ष सेवा केली आहे. त्यांच्यासाठी ही बातमी महत्वाची आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सर्वाइकल कॅन्सर जागरूकता उपक्रम सुरू

मुंबई : एमएसडी (ज्याला युनायटेड स्टेट्स आणि कॅनडामध्ये मर्क एंड कंपनी, इंक., रहवे, एन.जे., यूएसए म्हणून ओळखले जाते) यांनी आज भारतात आपल्या सर्वाइकल कॅन्सर जागरूकता मोहिमेची सुरुवात जाहीर केली. हा उपक्रम प्रसिद्ध अभिनेत्री, सार्वजनिक व्यक्तिमत्त्व आणि आई माधुरी दीक्षित नेने यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश महिलांच्या प्रतिबंधात्मक आरोग्याविषयीच्या चर्चांना पुढे आणणे आणि देशभरातील महिला व पालकांना सर्वाइकल कॅन्सर आणि त्याच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेल्या योग्य आरोग्य पर्यायांविषयी डॉक्टरांशी चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. सर्वाइकल कॅन्सर हा भारतातील महिलांना प्रभावित करणाऱ्या सर्वात सामान्य कॅन्सरपैकी एक आहे. वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेऊन आणि योग्य प्रतिबंधात्मक उपाय केल्यास हा आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो, तरीही भारतात दर सात मिनिटांनी जवळपास एका महिलेचा मृत्यू होतो, म्हणजेच दररोज सुमारे 200 मृत्यू होतात (ग्लोबोकॅन एचपीव्ही इंडिया रिपोर्ट 2023 नुसार डेटा). ही मोहीम विशेषतः महिलांमध्ये जागरूकतेची कमतरता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा घेण्यास होणारा विलंब या महत्त्वाच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते.

## भारतीय बँकिंग क्षेत्रात शांत क्रांती होत आहे

छत्रपती संभाजीनगर : भारतीय बँकिंग क्षेत्रात शांत क्रांती होत आहे. गेल्या दशकात, आम्ही "फ्रंट-एंड" मध्ये गुंतलो होतो, ज्यात आकर्षक ॲप्स, 10-सेकंदांचे कर्ज मंजूर करणे आणि घर्षणरहित यूपीआय पेमेंट्स यांचा समावेश होता. आम्ही स्क्रीनवर सोयीस्करता निर्माण केली. परंतु 2030 कडे पाहताना, स्पर्धात्मक युद्धभूमी बदलत आहे. जिथे प्रत्येक निओ-बँक आणि फिनटेक सुंदर इंटरफेस देतात, तिथे "ग्राहक अनुभव" सामान्य झाला आहे. आता खरा फरक म्हणजे मी ज्याला व्यवसाय अनुभव म्हणतो: अदृश्य, लवचिक यंत्रणा जी आम्ही आमच्या ग्राहकांना दिलेल्या वचनाला शक्ती देते - श्री. लक्ष्मण वेलायुथम, प्रमुख – मुख्य विपणन अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक फ्रंट-एंडचा भ्रम- बँकिंग ॲपला लक्झरी कारच्या डॅशबोर्डसारखे समजा. ते भव्य दिसते, परंतु जर इंजिन (आमची मुख्य बँकिंग प्रणाली) बिघडले किंवा सुरक्षा प्रणाली (अनुपालन आणि सायबरसुरक्षा) अयशस्वी झाली, तर ड्रायव्हिंगचा अनुभव कोसळतो. ग्राहक-केंद्रित चॅनेल मुख्य बँकिंग प्रणाली, अनुपालन फ्रेमवर्क, सायबरसुरक्षा नियंत्रणे आणि सेवा वर्कफ्लो यांच्या समन्वयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.

## इंडिपेन्डन्स ब्रुइंग कंपनी (आयबीसी) पोर्टफोलिओमध्ये विविधता

मुंबई : ट्रेंटन ग्रुपचे सहकार्य असलेल्या स्वदेशी क्राफ्ट बिअर ब्रँड इंडिपेन्डन्स ब्रुइंग कंपनी (आयबीसी) ने आज भारतीय बाजारपेठेसाठी कॅनमधील आपली सुपर-प्रीमियम ब्रँड  बिअर सादर केली. एन्झो आणि विट उनो ही कंपनीची दोन उत्पादने आता महाराष्ट्रातील ८ शहरांमध्ये 2000 पेक्षा अधिक विक्री केंद्रांवर (रिटेल टचपॉइंट्स) उपलब्ध असतील.  हे ब्रँड्स नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ट्रेंटन ग्रुप कंपनीच्या द्वारे अमलगमेटेड ब्रुअरीज प्रा. लि. (एबीपीएल) मार्फत उत्पादित व विपणन केले जात आहेत. एबीपीएलने नाशिक येथे अत्याधुनिक, पूर्णतः स्वयंचलित मायक्रोब्रुअरी उभारली आहे.

## आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या स्त्रीला दिला हृदयस्पर्शी सलाम

मदर्स डे हा फक्त दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. हा क्षण आहे थांबून त्या शांत सामर्थ्याला, अमर्याद संयमाला आणि निस्वार्थ प्रेमाला वंदन करण्याचा, जे आई आयुष्यभर देते पण कधीही परतफेडीची अपेक्षा ठेवत नाही. यंदा आईचा दिवस साजरा करताना सोनी सबचे कलाकार गुलकी जोशी, दीक्षा जोशी, नितीन बाबू आणि ऋषी सक्सेना यांनी त्यांच्या आयुष्यातील अनोख्या आठवणी, जपलेल्या क्षणांचा आणि पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या जीवनमूल्यांचा अनुभव शेअर केला. कलाकारांनी त्यांच्या आईबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली, ज्या त्यांच्या भावनिक आधारस्तंभ ठरल्या आहेत. प्रत्येक आव्हानात आणि प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या आईने त्यांना प्रोत्साहन दिले, आणि पडद्यावर तसेच पडद्यामागे त्यांचा प्रवास घडवला.

## 'हस्तिनापुर के वीर' मालिकेत भेटा तरुण कौरव आणि पांडवांना

सोनी सब भारतीय महाकाव्य महाभारत पुन्हा जिवंत करत आहे, त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यांपासून. हस्तिनापुर के वीर प्रेक्षकांना पांडव आणि कौरवांच्या बालपणात घेऊन जाते, जिथे त्यांच्या अनुभवांनी त्यांना घडवलं आणि त्यांच्या श्रद्धा व निवडींचा पाया रचला. या मालिकेत पांडव आणि कौरवांमधील सुरुवातीच्या नातेसंबंधांना प्रकाशझोतात आणलं आहे पांडव कर्माचे परिणाम शिकतात तर कौरवांना सत्ता कधी हातातून निसटू शकते हे जाणवतं. पांडवांची भूमिका अतर खान युधिष्ठिर च्या भूमिकेत, सुभाष खत्री भीमच्या भूमिकेत, उर्वा सावल्या अर्जुनच्या भूमिकेत, हरित गबानी नकुलच्या भूमिकेत आणि मयंक यादव सहदेवच्या भूमिकेत साकारत आहेत.


## पहिल्या रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची यशस्वी कामगिरी

छत्रपती संभाजीनगर : हडपसर येथील नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरने रोबोटचा वापर करून कीहोल पोर्ट्सद्वारे संपूर्णपणे करण्यात येणारी 'रोबोटिक लेफ्ट एट्रियल मीक्झोमा एक्सिजन' ही गुंतागुंतीची हृदयातील गाठ काढण्याची शस्त्रक्रिया नुकतीच यशस्वीरित्या केली. हृदयविकार उपचार क्षेत्रात हे एक महत्वाचे यश आहे. ही शस्त्रक्रिया एका ५५ वर्षीय महिलेवर करण्यात आली. नियमित तपासण्यांमध्ये त्यांच्या छातीच्या डाव्या कप्प्यात ट्युमर (गाठ)असल्याचे निदान झाले होते. अशा प्रकारच्या गाठींना लेफ्ट एट्रियल मीक्झोमा असे म्हणतात. ही सामान्यपणे आढळणारी आणि कर्करोगग्रस्त नसलेली गाठ (बेनाइन ट्युमर) असली तरी यामुळे रुग्णांना स्ट्रोक येणे किंवा धाप लागणे यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.अशा स्थितीत शस्त्रक्रियेद्वारे गाठ काढून टाकणे हा एकमेव उपचार पर्याय असतो.

## हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रम प्रवेश; अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर** | केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेत हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रम बरगढ (ओडीशा) येथे शिकविला जातो.  त्यासाठी महाराष्ट्र राज्यासाठी १३ + १ जागा आहेत. या अभ्यासक्रमासाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी  प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, बाळासाहेब पवार सहकार भवन, तिसरा मजला, जाफर गेट, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत विहीत नमुन्यात दि.१० जून पर्यंत प्रवेश मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज विहित नमुन्यात प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग आयुक्तालय यांच्याकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमूना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे http.www.dirtexmah.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## आनंदाबाई मैनाजी बांबर्डे यांचे निधन



**खुलताबाद**| आनंदाबाई मैनाजी बांबर्डे राहणार पिंपरी तालुका फुलंब्री वय  ९०  वर्ष यांचे दि ६ मे रोजी  रात्री १०.१५ च्या सुमारास  छत्रपती संभाजी येथील एम जी एम हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान निधन झाले  त्यांच्या पार्थिवावर गुरुवार रोजी सकाळी १०.३० वाजता अंतिम संस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात  चार मुले सून नातवंड एक मुलगी असा परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार नारायण बांबर्डे यांच्या त्या आई आहे.

# तीन अभियंत्यांवर 210 गावांच्या पाणीपुरवठ्याची धूरा

## तालुक्यातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागात मनुष्यबळाची तीव्र कमतरता

**तभा वृत्तसेवा / सहयोग प्र.जावळे**






कन्नड : दि.०७ मे - केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेची जबाबदारी सांभाळणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाच्या कार्यालयातच मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने संपूर्ण कारभार अक्षरशः तुटपुंज्या मनुष्यबळावर सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे. परिणामी तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, दुरुस्ती, देखरेख आणि तक्रार निवारणावर परिणाम होत असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे.

कन्नड तालुक्यात एकूण 142 ग्रामपंचायती अंतर्गत 210 गावे येतात. या सर्व गावांच्या पाणीपुरवठा योजना तसेच जलजीवन मिशन कामांची धुरा उपविभागीय अधिकारी ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग (जि.प.) कार्यालयावर आहे. मात्र एवढ्या मोठ्या कार्यक्षेत्रासाठी आवश्यक अधिकारी-कर्मचारीच उपलब्ध नसल्याचे चित्र आहे.

कार्यालयात एक उपअभियंता आणि सहा कनिष्ठ अभियंता अशी पदे मंजूर आहेत. मात्र प्रत्यक्षात केवळ तीन अभियंते एक वरिष्ठ सहाय्यक कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कनिष्ठ लिपिक पदही रिक्त आहेत. एकूण मंजूर नऊ पदांपैकी फक्त पाच अधिकारी-कर्मचारी कार्यरत असून उर्वरित पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे उन्हाळ्यात तालुक्यात अनेक गावांत पाणीटंचाई गंभीर होत असताना दुसरीकडे जलजीवन मिशन अंतर्गत अनेक कामे प्रलंबित असल्याची ओरड सुरू आहे. अशा परिस्थितीत केवळ तीन अभियंत्यांवर 210 गावांचा कारभार सोपविण्यात आल्याने योजनांची गुणवत्ता, देखरेख आणि वेळेत कामे पूर्ण होण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करत असताना प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या विभागातच मनुष्यबळाची कमतरता असल्याने शासनाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. रिक्त पदे तातडीने भरून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला सक्षम करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## चापानेर पेट्रोल पंपाजवळ एस.टी. बस व ट्रॅक्टरची जोरदार धडक; ट्रॅक्टर चालक गंभीर

**तभा वृत्तसेवा**



कन्नड :दि.०७ मे - कन्नड-वैजापूर मार्गावरील चापानेर येथील पेट्रोल पंपाजवळ दि. ०७ रोजी दुपारी एस.टी. बस व ट्रॅक्टर यांच्यात झालेल्या अपघातात ट्रॅक्टर चालक गंभीर जखमी झाला असून बस चालक किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, एम.एच.14 बी.टी.2457 क्रमांकाची एस.टी. बस कन्नडवरून वैजापूरच्या दिशेने जात होती. त्याचवेळी चापानेर येथील पेट्रोल पंपावरून विना क्रमांकाचे ट्रॅक्टर अचानक मुख्य रस्त्यावर आल्याने बस व ट्रॅक्टर यांच्यात जोरदार धडक झाली.

या अपघातात एस.टी. बस चालक बाळासाहेब रघुनाथ काळे हे किरकोळ जखमी झाले, तर ट्रॅक्टर चालक गंभीर जखमी झाला. जखमी ट्रॅक्टर चालकास पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे हलविण्यात आले.

अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच बीट जमादार, पोलीस हवालदार संदीप कनकुटे व पोलीस अंमलदार उद्धलसिंग नागलोत यांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

## भारतातील सर्वात मोठे प्रादेशिक ओटीटी व्यासपीठ 'स्टेज' मराठीत दिमाखात दाखल!

छत्रपती संभाजीनगर – भारतीय सिनेसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे मराठी असल्याने अभिजात दर्जा लाभलेली मराठी भाषेतील सिनेसृष्टीला सिनेमांचे माहेरघर मानले जाते. राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय पातळीवरील विविध पुरस्कार सोहळ्यांमध्ये मराठी मनोरंजन विश्वाचा डंका वाजला असून, मराठी सिनेमांनी जागतिक पातळीवरही आपला वेगळा ठसा उमटवला आहे. सध्याच्या डिजिटलच्या युगात मराठी प्रेक्षकांनाही डिजिटल मनोरंजनाची सवय लागलेली असताना सध्याच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर दर्जेदार मराठी कॉंटेंट उपलब्ध होत नसल्याची खंत रसिकांकडून व्यक्त होत आहे. जणू त्यावर रामबाण उपाय बनून भारतातील सर्वात मोठे प्रादेशिक ओटीटी व्यासपीठ 'स्टेज' मराठीत दिमाखात दाखल झाले आहे.

अंधेरीतील वेदा कुणबा थिएटरमध्ये 'स्टेज' मराठीची अधिकृत घोषणा करण्यात आली. या सोहळ्याला 'स्टेज'चे सह-संस्थापक प्रवीण सिंघल, स्टेज ओटीटी मराठी कन्टेन्ट हेड राजेश पाठक तसेच मराठी मनोरंजन विश्वातील दिग्गज कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ उपस्थित होते. कलाकारांच्या मांदियाळीत अनंत महादेवन, चिन्मय मांडलेकर, क्षितीज दाते, श्रेया बुगडे, उर्मिला जगताप, पुष्कर जोग, निशा परुळेकर यांसारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता. यावेळी 'स्टेज' मराठीवर दाखवल्या जाणाऱ्या मराठी कलाकृतींची घोषणाही करण्यात आली. 'स्टेज' हे केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नसून, ही एक क्रांती असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. २०१९ मध्ये स्थापन झालेले 'स्टेज' हे भारतातील पहिले बोलीभाषा आधारित ओटीटी प्लॅटफॉर्म आहे. हरयाणवी, राजस्थानी, भोजपुरी आणि गुजराती भाषेत यशस्वी क्रांती केल्यानंतर, 'स्टेज' आता कोट्यावधी मराठी प्रेक्षकांना त्यांच्या मातीतील, त्यांच्या बोलीभाषेतील दर्जेदार आणि कौटुंबिक आशय देण्यासाठी कटिबद्ध आहे.

## गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी अभय योजना जाहीर

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (CMRDA) गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी नागरिकांना मोठा दिलासा देणारी अभय योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेद्वारे नागरिकांना कमी दरात बेटरमेंट चार्जेस भरून आपला विकास नियमित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, दि. 01 मे 2026 ते 31 जुलै 2026 या कालावधीत बेटरमेंट चार्जेसवर फक्त 10 टक्के शुल्क आकारले जाणार आहे. त्यानंतर दि. 01 ऑगस्ट 2026 ते 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत 50 टक्के शुल्क आकारण्यात येईल. दि. 01 नोव्हेंबर 2026 पासून मात्र पूर्ण शुल्क आकारले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी नगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील नागरिकांनी या अभय योजनेचा लाभ घेऊन गुंठेवारी विकास नियमित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्राधिकरणाने केले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी स्मार्ट सिटी कार्यालय, आमखास मैदानाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

उप महानगर नियोजनकार यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला आहे.

# इस्त्राईलमध्ये रोजगाराची संधी; इच्छुकांकडून अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील कुशल युवक-युवतींना परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्याकरीता महाराष्ट्र इंटरनॅशनल हे वेबपोर्टल सुरू करण्यात आले आहे. सद्यस्थितीत इस्त्राईल देशात "Nursing, Healthcare" या क्षेत्रात "Home Based Caregiver" या पदाच्या ३५०० जागा उपलब्ध आहेत. या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, अटी व शर्ती, निवड प्रक्रिया, मानधन व इतर फायदे इ. बाबत सविस्तर माहिती https://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी सदर संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी केले आहे.

अर्हता- १. इस्त्राईल देशात नोकरीसाठी उमेदवारांकडे "Home Based Caregiver" या पदासाठी आवश्यक असलेले भारतातील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेद्वारा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट किंवा मिडवाइफरी या क्षेत्रातील किमान ९९० तासांचा (ऑन जॉब ट्रेनिंगसह) अभ्यासक्रम पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. जी.डी.ए./ए.एन.एम. /जी.एन.एम./बि.एस.सी. नर्सिंग या क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार पात्र आहेत. उमेदवारांना इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्ष असावे. उंची किमान १.५ मि. आणि वजन किमान ४५ किलो असावे.

अर्ज करण्याची पद्धत- इच्छुक पात्र उमेदवारांनी https://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. पदाचे कार्यविवरण, वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, अर्ज प्रक्रिया याबाबत माहिती घ्यावी. तसेच इच्छुक उमेदवारांनी सदर वेबपोर्टलद्वारे ऑनलाइन अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मालजीपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी प्रत्यक्ष अथवा या कार्यालयाच्या ०२४-२९५४८५९ या दूरध्वनी क्रमांकावर स. पावणे दहा ते सायं.सव्वा सहा या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

### मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. १४२/२०२६

अर्जदार:-१. हिराबाई रतन मुंजाळ, वय, ७३ वर्ष धंदा. शेती रा. अशोक नगर, बिकलठाणा एम.आय.डी.सी, छ.संभाजीनगर ता. जि.छ. संभाजीनगर

२. संजय रतन मुंजाळ, वय. ४४ वर्ष धंदा. शेती रा. खडकनारळा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

३. भारत रतन मुंजाळ, वय. ३९ वर्ष चंदा. शेती रा. खडकनारव्ळ, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

४. पोपट रतन मुंजाळ, वय. ३८ वर्ष धंदा. शेती रा. खडकनारळा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

- विरूद्धः-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण -कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला असुन, कथन केले की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ ते ४ यांची वडिल नामे रतनराव उर्फ रतन भीमा मुंजाळ हे दि. २२/०९/२०२५ रोजी मौजे खडकनारळा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत व अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत रतनराव उर्फ रतन भीमा गुंजाळ यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत रतनराव उर्फ रतन भीमा मुंजाळ यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत रतनराव उर्फ रतन भीमा मुंजाळ हे शेतमजूर असल्याकारणाने अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी तसेच कार्यालयीन कामासाठी मयत रतनराव उर्फ रतन भीमा मुंजाळ यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

ज्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत रतन भीमा मुंजाळ यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत रतन भीमा मुंजाळ यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणारा आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. करिता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

आदेशावरुन

कनिष्ठ लीपीक | सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

### मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापुर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. २७०/२०२६

अर्जदार -१. अण्णासाहेब विशनाथ लाळगे, वय ७९ वर्ष धंदा, शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि.छ.संभाजीनगर

२. लताबाई जगन्नाथ लाळगे, वय.६४ वर्ष धंदा. शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

३ सुरेश जगन्नाथ लाळगे, वय. ४६ वर्ष धंदा. शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

४ दिगंबर जगन्नाथ लाळगे, वय ४६ वर्ष धंदा. शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्धः-

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण- कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला असुन, कथन केले को, असे की, अर्जदार क्र १ यांचे वडील अर्जदार क. २ यांचे सासरे व अर्जदार क. ३ व ४ यांचे आजोबा नामे विश्वनाथ काशीनाथ लाळगे हे दि. ०६/०४/१९९८ रोजी मौजे जामगाव ता. गंगापुर जि.छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांच्या व्यतीरिक्त मयत विश्वनाथ काशीनाथ लाळगे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही. व अर्जदार हे मयत विश्वनाथ काशीनाथ लाळगे यांचे कायदेशीर वारस आहे. मयत विश्वनाथ काशीनाच लाळगे यांचा मुलगा तसेब अर्जदार क. २ यांचे पती व अर्जदार क. ३ व ४ यांचे वडील नामे जगन्नाथ विश्वनाथ लाळगे हे दि. ३०/१०/२००९ रोजी मौजे जामगाव ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार क. २ ही सून या नात्याने तर अर्जदार क. ३ अ ४ हे नातु या नात्याने मयत विश्वनाथ काशीनाथ लाळगे यांचे कायदेशीर वारस आहेत.

ज्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत सीताबाई भार्गवद कुकलारे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यात कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत सीताबाई भागचंद कुकलारे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणारा आधेप ग्राहय धरला जाणार नाही. करिता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

पुता २२/०६/२०२६

आदेशावरुन

कनिष्ठ लीपीक | सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

### मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ३२४/२०२६

अर्जदार:- केशरबाई जयवंत सुसलादे, वय, ७८ वर्ष धंदा. शेती रा. डोमेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

- विरूद्धः-

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण- कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला असुन, कथन केले की, असे की, अर्जदार यांचे पती नामे जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे हे दि. ३१/१२/२०२३ रोजी मौजे डोनेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. अर्जदार व मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांना कोणतेही आपत्य नव्हते. त्यामुळे, अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे हे शेतमजूर असल्याकारणाने अर्जदार हिस शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे. अर्जदार हिस मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांच्या वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हिने मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत जयवंता उर्फ जयवंत केसु सुसलादे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणारा आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. करिता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

पुढील ता. १२/०६/२०२६

आदेशावरुन

कनिष्ठ लीपीक | सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

### मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय खुलताबाद जि.छ.संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ३४/२०२६

अर्जदार -१. अशोक भागचंद कुकलारे, वय. ५८ वर्ग धंदा. शेती रा.गदाना खुलताबाद ता. खुलताबाद जि.छ.संभाजीनगर २. चंद्रभान भागचंद कुकलारे, वय. ५३ वर्ष धंदा. शेती रा. गदाना खुलताबाद ता. खुलताबाद जि.छ.संभाजीनगर कमलबाई कारभारी पुरे, वय, ७३ वर्ष धंदा शेती रा. पिंपळगाव (दिवशी), छ. संभाजीनगर कॅटोमेंट ता.जि.छ. संभाजीनगर ४ सुमनबाई उत्तम बड्डगे, वय. ५८ वर्ष धंदा. शेती य. गदाना खुलताबाद ता. खुलताबाद जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्धः-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला असुन, कचन केले की, असे को, अर्जदार क्र १ ते४ यांची आई नामे मयत सीताबाई भागचट कुकलारे हया दि. ०६/०४/२०१९ रोजी मौजे गदाना ता. खुलताबाद जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत सीतापाई भागंगट कुकलारे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत सीताबाई भागचंद कुकलारे यांचे कायदेशीर एकमेव वारस आहेत. मयत सीताबाई भागयद कुकलारे शेतमजूर असल्याकारणाने अर्जदार यांना शासकीय योजनाचा लाभमिळण्यासाठी तसेच कार्यालयीन कामासाठी मयत सीताबाई भार्गवद कुकलारे याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत सीताबाई भार्गवद कुकलारे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत सीताबाई भागचंद कुकलारे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणारा आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. करिता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

आदेशावरुन

कनिष्ठ लीपीक | सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटण / नोटीस

**मा. विदयमान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

दि. कि. अर्ज नं. ३२७/२०२६.

अर्जदार : १) ज्ञानेश्वर विष्णु हिवाळे वय ५५ वर्षे धंदा शेती, रा. गाजगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) नर्मदाबाई विठठल गवळी वय ५२ वर्षे धंदा-घरकाम, रा. आसेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) रुख्मनबाई दत्तात्रय जाधव वय ५० वर्षे धंदा-घरकाम, रा. करोडी ता. जि. औरंगाबाद ४) ध्रुरपाबाई शाईनाथ दापके वय ५० वर्षे धंदा-घरकाम, रा. मालीवाडा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे विष्णु मारोती हिवाळे हे दिनांक ०७/०२/२०२६ रोजी मौजे गाजगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असुन मयत विष्णु मारोती हिवाळे यांचे आई नामे मनोबाई मारोती हिवाळे व पत्नी नामे लिलाबाई विष्णु हिवाळे यापुर्वीच मयत झाले आहे. मयत विष्णु मारोती हिवाळे यांना अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारसदार असुन मयत विष्णु मारोती हिवाळे यांना अर्जदार नं. १ ते ४ हे एकमेव कायदेशिर वारसदार आहे अर्जदार यांना मयत विष्णु मारोती हिवाळे यांच्या वारस कार्यवाही कामी मयत विष्णु मारोती हिवाळे यांचे वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे.

आदेशावरुन

कनिष्ठ लीपीक | सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटण / नोटीस

**मा. विदयमान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

दि. कि. अर्ज नं. ३२८/२०२६.

अर्जदार :- १) मुरलीधर एकनाथ टेकाळे वय ७९ वर्षे धंदा शेती, २) हिराबाई भाउसाहेब चावरे वय ७६ वर्षे धंदा घरकाम, रा. सलबतपुर ता. नेवासा जि. अहमदनगर ३) हौसाबाई रावसाहेब टेकाळे वय ७२ वर्षे धंदा-शेती, ४) सुरेश रावसाहेब टेकाळे वय ५२ वर्षे धंदा-शेती, ५) रविंद्र रावासाहेब टेकाळे वय ४९ वर्षे धंदा शेती, अर्जदार नं. १,३ ते ५ रा. गळनिंब ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) पुष्पाबाई विलास फांदाडे वय ४८ वर्षे धंदा घरकाम, रा. केसापुरी ता. पैठण नि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार नं. १ ते २ यांचे वडील व अर्जदार नं. ३ यांचे देर आणि अर्जदार नं. ४ ते ६ यांचे आजोबा नागे एकनाथ पंढरीनाथ टेकाळे हे दिनांक १६/१२/२००८ रोजी मौजे गळनिंब ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असुन मयत एकनाथ पंढरीनाथ टेकाळे यांचे आई नामे गुलाबाई पंढरीनाथ टेकाळे व पत्नी नामे छबाबाई एकनाथ टेकाळे यापुर्वीच मयत झाले असुन अर्जदार नं. ३ यांचे पती व अर्जदार नं. ४ ते ६ यांचे वडील नामे रावसाहेब एकनाथ टेकाळे हे दिनांक १८/०९/२०१५ रोजी मौजे गळभिंब ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असुन मयत रावसाहेब एकनाथ टेकाळे यांचे आई नामे छयाबाई एकनाथ टेकाळे यापुर्वीच मयत झाले आहे. मयत एकनाथ पंढरीनाथ टेकाळे यांना अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारसदार असुन मयत रावसाहेब एकनाथ टेकाळे यांना अर्जदार नं. ३ ते ६ हे एकमेव कायदेशिर वारसदार आहे अर्जदार यांना मयत एकनाथ पंढरीनाथ टेकाळे व रावसाहेब एकनाथ टेकाळे यांच्या वारस कार्यवाही कामी मयत एकनाथ पंढरीनाथ टेकाळे व रावसाहेब एकनाथ टेकाळे यांचे वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | साहाय्यक अधिक्षक

मा. दिवाणी क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

तालुक्यातील आंबेवाडी येथे कर्जाच्या वाढत्या ओझ्याला कंटाळून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.

गोरोबा विष्णू गोडसे (वय ५४) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोडसे यांच्यावर शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा मोठा बोजा होता.



उत्पन्नात घट, पिकांचे अपयश आणि आर्थिक अडचणी यामुळे ते गेल्या काही दिवसांपासून चिंतेत होते. या नैराश्यातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला असून या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### आदर्श शिक्षक पुरस्काराने सोमनाथ तौर व सविता गिरी यांचा सन्मान

**भूम, दि.७ मे -**

जि.प.प्रा. शाळा डोकेवाडी, ता. भूम येथे कार्यरत असलेले विद्यार्थी गुणवत्तेसाठी सतत धडपडणारे उपक्रमशील, तंत्रस्नेही, उत्तम निवेदक तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शिक्षक सोमनाथ दासा तौर व सविता गिरी यांना पंचायत समिती भूम शिक्षण विभागाच्या वतीने सन २०२३-२०२४ चा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हाराष्ट्र दिनानिमित्त भूम येथे आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील प्रलंबित तीन वर्षांचे पुरस्कार वितरित करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सभापती पूजा ढगे, उपसभापती प्रियंका रणबागुल, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी, विस्ताराधिकारी सूर्यकांत साळुंखे, अनिता जगदाळे, केंद्रप्रमुख अभिमन्यू निकम, बाजीराव अहिरे, अरुण कांबळे तसेच तालुक्यातील शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते. सोमनाथ तौर व सविता गिरी यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.



### बँक ऑफ महाराष्ट्र ईट शाखेतील चार अधिकाऱ्यांच्या बदल्या

**भूम, दि.७ मे -**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या ईट शाखेतील शाखा व्यवस्थापकासह चार अधिकाऱ्यांच्या एकाच वेळी बदल्या झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शाखा व्यवस्थापक अजय चौहान, उपशाखा व्यवस्थापक हरिकृष्ण पाला, योगेश शर्मा व कृषी अधिकारी आबासाहेब भागवत यांची अन्यत्र बदली करण्यात आली. बदली झालेल्या अधिकाऱ्यांचा निरोप समारंभ वसुली विभाग व बँक मित्रांच्या वतीने उत्साहात पार पडला. तसेच नूतन शाखा व्यवस्थापक म्हणून राजीव रंजन, उपशाखा व्यवस्थापक म्हणून मंजुनाथ माटम व सरदार नाईक यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी अमरनाथ सिंग, जितू पवार, त्रिशाला सांगवीकर, सोनाली हुंबे, प्रवीण भोईटे, योगेश चव्हाण आदी उपस्थित होते.

### मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा

**धाराशिव, दि.७ मे -**

मद्यधुंद अवस्थेत मोटारसायकल चालवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,




दिनकर बिभीषण वडगणे (वय ५२, रा. जवळे दु., ता. जि. धाराशिव) आणि अजीत रमेश कुटे (वय ४०, रा. सातेफळ, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी दि. ६ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.२३ ते ८.२५ वाजण्याच्या सुमारास एनएच-५२वरील आळणी फाट्याजवळ मद्यप्राशन करून मोटारसायकल चालविल्याचे निदर्शनास आले. यावेळी आरोपी हे मोटारसायकल क्रमांक एमएच २५ एक्स १६४८ आणि एमएच २५ व्ही ५२७१ चालवत होते. त्यांनी मोटार वाहन कायदा कलम १८५ चे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# धाराशिव हादरले : जिल्ह्यात दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

**एका घटनेत बालविवाह करून तर दुसऱ्या घटनेत डोंगर परिसरात नेऊन अतिप्रसंग...**

### आरोपींवर पॉक्सो अंतर्गत गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या दोन गंभीर घटना समोर आल्याने संतापाची लाट उसळली आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित आरोपींविरुद्ध पॉक्सो कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



पहिल्या प्रकरणात मुरूम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील १७ वर्षे १० महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे संगनमत करून लग्न लावून देण्यात आले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २२ मे २०२५ ते दि. १ मे २०२६ या कालावधीत आरोपींनी पीडित मुलीचे लग्न लावून दिले. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीने दि.६ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२) (एम), ३ (५) तसेच पॉक्सो कायदा कलम ४ आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा कलम ९ व ११ अन्वये पाच आरोपींविरुद्ध मुरूम पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दरम्यान, दुसऱ्या घटनेत येरमाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील १४ वर्षे ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दि.७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगी घरी एकटी असताना आरोपीने तिचा गैरफायदा घेतला.

त्यानंतर तिला गावालगतच्या डोंगर परिसरात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडितेच्या आईने दि.६ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), ६४ (२) (फ) (जे) तसेच पॉक्सो कायदा कलम ४ व ८ अन्वये येरमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दोन्ही घटनांमुळे जिल्ह्यात संताप उसळली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वर्ग-२ जमिनींच्या प्रकरणांवरून शेतकरी व प्लॉटधारक आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

जिल्ह्यातील वर्ग-२ जमिनी, प्लॉट आणि घरांच्या वर्ग-१ प्रक्रियेत महसूल प्रशासनाकडून होत असलेल्या कथित अडवणुकीविरोधात शेतकरी व प्लॉटधारक आक्रमक झाले आहेत.

हजारो प्रकरणे प्रलंबित राहिल्याने जमीन व्यवहार ठप्प झाले असून, बँकांकडून कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही वर्ग-२ जमिनी व प्लॉट वर्ग-१ करण्याबाबत कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करून फाईली महिनोनमहिने प्रलंबित ठेवल्या जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तहसील, उपविभागीय, भूसंपादन, अपर जिल्हाधिकारी व सामान्य प्रशासन विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. काही ठिकाणी पैशांची मागणी होत असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे.

प्रलंबित प्रकरणे निश्चित मुदतीत निकाली काढावीत, विशेष शिबिरे आयोजित करावीत तसेच मुद्दाम फाईली रखडविणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सेवा हमी कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला आ. प्रवीण स्वामी यांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

अनुसूचित जातींमध्ये अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करून ५९ प्रवर्गांमध्ये फूट पाडण्याचा राज्य सरकारचा डाव असल्याचा आरोप आमदार प्रवीण स्वामी यांनी केला. या निर्णयाविरोधात पावसाळी अधिवेशनात ठाम भूमिका मांडली जाईल तसेच गरज पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.



शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी विविध समाजघटकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानिक तरतुदींना कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नसल्याचे स्वामी यांनी स्पष्ट केले.

संयोजक धनंजय शिंगाडे यांनीही सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर आंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला. प्रा. संजय कांबळे यांनी सामाजिक समतेला धक्का बसत असल्याची भूमिका मांडली, तर राजाभाऊ ओव्हाळ यांनी ५९ प्रवर्गांनी एकसंघ राहून संघर्ष करण्याचे आवाहन केले.

बैठकीस ॲड. ज्योती बडेकर, ॲड. इंद्रजीत शिंदे, अनिल हजारे, यशपाल बनसोडे, अशोक बनसोडे आदी उपस्थित होते.

## कामाच्या वेळा बदलल्या : वाढत्या उष्णतेने भूम तालुका होरपळला

### दुपारी रस्ते ओस; शेतकरी, व्यापारी आणि नागरिक त्रस्त

**महावीर जालन**
**भूम, दि.७ मे -**

भूम तालुक्यात यंदा उन्हाचा तडाखा विक्रमी पातळीवर पोहोचला असून तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान झेपावत आहे. फेब्रुवारीपासूनच वाढत्या उष्णतेची चाहूल लागली होती; मात्र मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात ती अधिक तीव्र झाली आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत होत असून शेतकरी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.



कडक उन्हामुळे शेतकऱ्यांनी शेतीकामाच्या वेळांमध्ये मोठा बदल केला आहे. पहाटे ६ ते ११ या वेळेतच बहुतांश कामे उरकली जात असून दुपारी ४ नंतर पुन्हा कामांना सुरुवात होत आहे. दुपारी १२ ते ४ या कालावधीत शेतातील कामे पूर्णपणे बंद ठेवली जात आहेत. उष्णतेमुळे पिकांवर परिणाम होऊन करपण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटत असल्याने पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत आहे.

वाढत्या तापमानाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावरही जाणवत असून निर्जलीकरण, डोळ्यांची जळजळ, उकाड्यामुळे झोप न लागणे अशा तक्रारी वाढल्या आहेत.

विशेषतः रात्रीदेखील उकाडा कायम राहत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

दरम्यान, बाजारपेठांवरही या उष्णतेचा स्पष्ट परिणाम दिसून येत आहे. दुपारनंतर प्रमुख रस्ते ओस पडत असून ग्राहकांची वर्दळ कमी झाली आहे. व्यापाऱ्यांना ग्राहकांच्या प्रतीक्षेत बसावे लागत असल्याने स्थानिक अर्थचक्रावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

प्रशासनाकडून नागरिकांना पुरेसे पाणी पिणे, सावलीत राहणे आणि दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

> उन्हाची तीव्रता खूप वाढल्याने दुपारी येथील मुख्य रहदारीचे रस्तेही ओस पडू लागले आहेत. परिणामी दुपारी ग्राहक फिरकेनासे झाल्याने दुकानात आम्हाला हताशपणे बसावे लागत आहे. सकाळी आणि रात्री ग्राहक दुकानात येत आहेत.
>
> **- अनिल बोंदार्डे,** व्यापारी.

## आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'फार्मा दशोध्याय २०२६' संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी येथे फार्मा दशोध्याय २०२६ हा बहुआयामी शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैचारिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र इतिहास परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ. सतीश कदम आणि रवींद्र केसकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. गाझी यांनी संस्थेच्या विविध शैक्षणिक व विद्यार्थीहिताच्या उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना प्रा.डॉ. सतीश कदम यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी जगन्नाथ धायगुडे यांनी वेळेचे व्यवस्थापन व शिस्त यांचे महत्त्व पटवून देत यशस्वी आयुष्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे सांगितले. तर बाळासाहेब जमाले यांनी सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि औषधनिर्मिती क्षेत्राचे देशाच्या प्रगतीतील महत्त्व अधोरेखित केले.

या प्रसंगी महाविद्यालयात आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा तसेच विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विशेषतः ऋझढ परीक्षेत यश संपादन करणाऱ्या फातिमा सिलावत, सोफिया बागवान, पूजा लोमटे आणि निकिता देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## नसरापूर घटनेचा निषेध; कठोर कारवाईची विश्व हिंदू परिषदेची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार व हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, धाराशिव यांच्या वतीने संताप व्यक्त करण्यात आला.

संघटनेने दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात अत्याचार रोखण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

हे निवेदन जिल्हाध्यक्ष ॲड. गजानन चौगुले, ॲड. अजित गुंड पाटील, विजयकुमार वाघमारे, जिल्हा संयोजक राजकुमार गाढवे व अनिकेत नवले यांनी सादर केले.

## नळदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी ४.६१ कोटींचा निधी मंजूर



**गणपती महाल व खंडोबा प्रकटस्थळाच्या जतनाची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ मे -**

नळदुर्ग किल्ला या प्राचीन व ऐतिहासिक किल्ल्याच्या देखभाल व संवर्धनासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ४ कोटी ६१ लाख ९२ हजार २०४ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून किल्ल्यात विविध दुरुस्ती व संवर्धनाची कामे करण्यात येणार असून त्यामुळे किल्ल्याच्या वैभवात भर पडण्यासोबतच पर्यटनालाही चालना मिळणार आहे. या कामांमुळे किल्ल्याला पुन्हा गतवैभव प्राप्त होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून सध्या नळदुर्ग किल्ला संवर्धन आणि स्थळ व्यवस्थापन आराखडा अंतर्गत ७ कोटी १८ लाख ९१ हजार ७९१ रुपयांच्या निधीतून विविध कामे सुरू आहेत. हे काम सुरू असतानाच आता नव्याने जिल्हा नियोजन समितीकडून आणखी ४.६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत गडकिल्ले, मंदिरे व संरक्षित स्मारकांच्या संवर्धनासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ३ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. त्यानुसार सन २०२५-२६ साठी नळदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सध्या ई-निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.

या कामांमध्ये किल्ल्यातील हत्तीखाना, प्रवेशद्वाराजवळील ओवऱ्या, मस्जिद, आदिलशाही मस्जिद, रंगमहाल, धान्य कोठारे यांचे जतन व दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच इमारतींमधील भेगा व सांधे दुरुस्त करणे, किल्ल्याच्या भिंतींची स्वच्छता, झाडाझुडपे काढणे, जुने प्लास्टर काढून नव्याने चुन्याचे प्लास्टर करणे तसेच लाकडी व दगडी बांधकामांची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

दरम्यान, किल्ल्यातील हिंदू धार्मिक अस्मितेची स्थळे असलेल्या गणपती महाल व श्री खंडोबा देवाच्या प्रकटस्थानाच्या जतन व संवर्धनाची मागणी पर्यटक व हिंदू बांधवांकडून होत आहे.

या दोन्ही स्थळांची आजपर्यंत कोणतीही मोठी दुरुस्ती अथवा संवर्धनाची कामे झालेली नाहीत. त्यामुळे ही पवित्र स्थळे अडगळीत पडल्याचे चित्र दिसून येत असून भविष्यात नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



पर्यटकांच्या मते, पुरातत्त्व विभागाच्या निगराणीखाली सुरू असलेल्या संवर्धन कामांमध्ये गणपती महाल व श्री खंडोबा देवाच्या प्रकटस्थानाचाही समावेश करावा.

या दोन्ही स्थळांचे जतन झाल्यास किल्ल्याच्या ऐतिहासिक वैभवात भर पडण्याबरोबरच ती श्रद्धास्थाने म्हणूनही विकसित होऊ शकतील.

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# शठे शाठ्यं समाचरेत्...

महाराष्ट्र दिनाच्या मंगलप्रसंगी संपूर्ण राज्य महोत्सवाच्या तयारीत असताना, पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे मानवतेला काळिमा फासणारी एक अतिशय संतापजनक घटना घडली. अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेला पाशवी अत्याचार आणि निर्घृण हत्या ही तिच्या कुटुंबाला हादरवणारी आणि समाजाला सुन्न करून टाकणारी घटना होती. या अमानवी घटनेनंतर फक्त पुणे जिल्हा नव्हे, तर अवघा महाराष्ट्र अद्याप संतापाने धुमसत आहे. या घटनेच्या पृष्ठभूमीवर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला आणि काळाची गरज असलेला कायदेशीर बदलाचा निर्णय, हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक मानला पाहिजे आणि त्यामुळेच त्याचे स्वागत केले पाहिजे.

१ मे रोजी नसरापूरमध्ये जे घडले, ते ऐकून अंगावर काटा येतो. साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून, तिची दगडाने ठेचून हत्या करणे आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठवणे, ही क्रूरतेची परिसीमा. भीमराव कांबळे या नराधम आरोपीचा गुन्हेगारी इतिहास पाहिला तर नुसता संताप येतो. त्याच्यावर यापूर्वीही विनयभंग आणि 'पोक्सो'सारखे गुन्हे दाखल होते. तरीही कायद्यातील पळवाटांचा आधार घेत तो समाजात मोकाट हिंडत होता. आपल्या व्यवस्थेची अत्यंत घातक अशी त्रुटी हीच, जिचा लाभ घेऊन असे नराधम पुन्हा पुन्हा गुन्हे करण्यासाठी पुढे येतात. समाज नासवतात. अशांसाठी रान मोकळे असावे का, या प्रश्नाचे उत्तरच कायद्यातील बदलांच्या स्वरूपात शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

नराधमांना पॅरोल नकोच, या अर्थाने कायद्यात बदल करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले आहेत. पॅरोल म्हणजे काय, तर, कायदेशीर परिभाषेत एखाद्या कैद्याला त्याच्या चांगल्या वर्तणुकीसाठी किंवा कौटुंबिक आपत्कालीन परिस्थितीसाठी निश्चित कालावधीसाठी कारागृहातून दिलेली तात्पुरती सुटका. कैद्याला पुन्हा मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी, या हेतूने ही सवलत दिली जाते. पण लैंगिक शोषण आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपी जेव्हा पॅरोलवर बाहेर येतात, तेव्हा ते केवळ पीडित कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी धोकादायक असतात, हेही येथे समजून घेतले पाहिजे. गुन्हेगारांनी 'पॅरोल' किंवा 'फर्लो'चा गैरवापर करून पुन्हा समाजात भीषण गुन्हे केल्याची अनेक उदाहरणे आहेत. मुंबईचे शक्ती मिल बलात्कार प्रकरण त्यातलेच. या प्रकरणातील आरोपी आधीच गुन्हेगारी प्रवृत्तीचे होते आणि त्यांनी जामिनावर असताना पुन्हा सामूहिक बलात्कार केला. मुंबईतीलच आणखी एक प्रकरण जे 'पॅरोल'च्या नियमांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. एका तरुणीच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला सज्जाद मोगल २०१६ मध्ये पॅरोलवर बाहेर पडला आणि तेव्हापासून फरार झाला. बराच काळ तो सापडला नाही. अशा गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना मानवतावादी दृष्टीने केलेल्या तरतुदींचा वापर करून काही काळ बाहेर काढणे देखील घातक ठरू शकते, हे यापूर्वी वारंवार सिद्ध झालेले आहे. बलात्कार आणि हत्येच्या आरोपाखाली शिक्षा भोगत असलेल्या हरयाणातील गुरमित राम रहीमला वारंवार पॅरोल मिळत असल्यामुळे न्यायालय आणि सामाजिक संस्थांनी अनेकदा ताशेरे ओढले आहेत. तज्ज्ञांच्या मते, अशा पॅरोलमुळे पीडितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो'च्या आकडेवारीनुसार आणि विविध कायदेतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, भारतात बलात्कार आणि खुनासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये शिक्षेची पुनरावृत्ती होण्याचे प्रमाण ५ ते ७ टक्के आहे. गुन्ह्याच्या पुनरावृत्तीला मर्यादा नसते. चिमुकल्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत ही भीती आणखी जास्त असते, कारण ती एक मानसिक विकृती मानली जाते. अनेकदा कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी किंवा गुन्हेगाराच्या चांगल्या वर्तणुकीचा आधार घेऊन पॅरोल दिला जातो. पण, वास्तव असे की, बहुतेकांची चांगली वर्तणूक ही तुरुंगापुरतीच मर्यादित असते. बाहेर आल्यावर त्यांची मूळ वृत्ती बदलत नाही, असे अनेक सर्वेक्षणांतून समोर आले आहे.

वारंवार गुन्हे करूनही पॅरोलवर सुटणाऱ्या गुन्हेगारांमुळे समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते, असे मत कायदेतज्ज्ञांनी वारंवार मांडले आहे. नसरापुरातील आरोपीच्या बाबतीतही हेच घडले. ज्याच्यावर आधीच गंभीर गुन्हे होते, तो समाजात उजळ माथ्याने वावरत होता. कारण कायद्याने त्याला तशी संधी दिली होती. अशी संधी आता कायद्यानेच हिरावून घेण्याची वेळ आली आहे, हे समजून घेतले पाहिजे. पॅरोलवर असा विचार करण्याचा निर्णय जाहीर होताच आता मानवाधिकाराच्या गप्पा करणाऱ्यांचे कान टवकारतील. तुरुंगात असलेल्या कैद्यांशी मानवीय दृष्टिकोनातून व्यवहार झाला पाहिजे, असा त्यांचा युक्तिवाद असतो. तो अजिबात चुकीचा नाही. परंतु, ज्या गुन्हेगारांच्या वर्तनात मानवतेचा लवशेष नाही, त्यांच्यासाठी कसला आला मानवाधिकार? भुरट्या चोराला आणि बलात्कारी किंवा खून करणाऱ्या गुन्हेगाराला एकाच तराजूत तोलणे, हा कायद्याचा पराभव नव्हे? चोराची आणि बलात्काऱ्याची शिक्षा वेगळी असेल, तर मग त्यांच्या पॅरोलचे नियमही वेगळे असायला हवेत. चोरी करणे हे सामाजिक परिस्थितीमुळे घडलेले कृत्य असू शकते. ती व्यक्ती सुधारण्याची शक्यताही असते. परंतु एखाद्या चिमुकलीवर अमानुष अत्याचार करून तिची हत्या करणे, ही केवळ आणि केवळ विकृतीच असते. अशा विकृत मानसिकतेच्या लोकांशी आपण कोणत्या न्यायाने मानवी व्यवहार करणार आहोत, हे ठरवले पाहिजे. ज्याने एका निरागस बालिकेचा जगण्याचा मूलभूत अधिकारच हिरावून घेतला, त्याला मानवाधिकाराचे कवच बहाल करणे हा तिच्या कुटुंबावर झालेला दुसरा अत्याचार ठरेल. समाजाला काय वाटते ते तर बोलायलाच नको.

कारागृहात गुन्हेगार सुधारल्याची उदाहरणे आहेत काय, असा प्रश्न केला तर त्याचे उत्तर होकारार्थी येईल. पण तशी उदाहरणे प्रामुख्याने आर्थिक गुन्हे किंवा रागाच्या भरात झालेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत आहेत. तिहार किंवा येरवडासारख्या जेलमध्ये राबवल्या जाणाऱ्या सुधारणावादी कार्यक्रमांमुळे काही कैदी बाहेर पडल्यावर सामान्य आयुष्य जगत आहेत हेही खरे आहे. एखाद्या चोराने चोरी सोडली किंवा रागाच्या भरात मारामारी करणाऱ्याने हिंसा सोडली, अशी उदाहरणे बरीच आढळतील. परंतु, चिमुकल्यांवर बलात्कार करणारे किंवा 'सायकोपॅथिक' खुनी यांचे सुधारण्याचे प्रमाण जागतिक स्तरावर पाहिले तरी नगण्यच. वैद्यकीय शास्त्रानुसार, अशा गुन्हेगारांना समाजात पुनर्स्थापित करणे कठीण असते, कारण त्यांची गुन्हेगारी ही त्यांच्या मानसिक रचनेचा भाग झालेली असते.

भारतीय संविधानाचे कलम २१ प्रत्येकाला जगण्याचा अधिकार देते. मात्र, नसरापूरसारख्या घटनेत 'दुर्मिळातील दुर्मिळ' या तत्त्वाखाली अशा नराधमांना फाशीची शिक्षा होणेच अपेक्षित असते. ज्याने दुसऱ्याच्या जगण्याचे स्वातंत्र्य आणि मानवाधिकार पायदळी तुडवले, त्याला मानवाधिकाराचे कवच मिळताच कामा नये. मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी दिलेले निर्देश अगदी स्पष्ट आहेत. लैंगिक शोषणातील गुन्हेगारांना भविष्यात कधीही मोकळा श्वास घेता येऊ नये यासाठी विधि व न्याय विभागाने तातडीने कायद्यात दुरुस्ती करावी आणि अशा नराधमांना कोणत्याही परिस्थितीत पॅरोल मिळू नये अशी व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले आहे. हा निर्णय क्रांतिकारकच म्हटला पाहिजे. कारण, सामान्य नागरिक आणि लहान मुला-मुलींच्या सुरक्षेचा अधिकार एखाद्या गुन्हेगाराच्या पॅरोल मिळवण्याच्या अधिकारापेक्षा किती तरी मोठा आहे. हा प्रस्तावित बदल शिक्षेची तीव्रता वाढवणारा नसला तरी अशा गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक निर्माण करणारा आहे. नसरापूरची घटना ही समाजासाठी एक सावधगिरीची घंटा आहे. कायदेशीर सुधारणा हा त्यावरचा पहिला आणि महत्त्वाचा उपाय आहे. आरोपी भीमराव कांबळे याला कठोर शिक्षा होणे, हे सरकारचे आणि पोलिस प्रशासनाचे कर्तव्य आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय जर कायद्यात परिवर्तित झाला, तर तो महाराष्ट्राच्या न्यायिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरेल. भारतीय नीतिशास्त्रातले एक अत्यंत प्रभावी सूत्र आहे- 'शठे शाठ्यं समाचरेत्'. अर्थात, जो दुष्ट आहे, त्याच्याशी दुष्टतेनेच वागले पाहिजे.


## प्रासंगिक

# रवींद्रनाथ टागोर आणि जाहिरात...

**डॉ. अरुंधती वैद्य**

शीर्षक वाचून नवल वाटले ना! रवींद्रनाथ टागोर यांचे नाव घेतले की प्रथम आठवतो तो नोबल पुरस्कार! नंतर त्यांची भाषणे, शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ, चित्रकार, कवी, संगीतकार अशा अनेक क्षेत्रांतला त्यांचा विक्रम आपल्या सगळ्यांना माहीत आहे. पण जाहिरातीतले रवींद्रनाथ... अविश्वासनीय वाटते ना! पण हे अगदी खरे आहे. विसाव्या शतकाची पहिली तीन दशके रवींद्रनाथांच्या जाहिरातींनी गाजवली होती. देखणे, उंच, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, समाजात मान आणि लोकप्रियता लाभलेले रवींद्रनाथ हे त्याकाळी भारतीय जाहिरातविश्वातले एक हुकमी एक्का होते. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या फोटोचा जाहिरातदारांनी मुक्तपणे वापर केला. त्यांनी लिहिलेल्या अनेक जाहिरातींचा मजकूर फार आकर्षक, लालित्यपूर्ण, नेमक्या शब्दांत उत्पादनाबद्दल ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करणारा होता. स्वदेशी चळवळीला प्रोत्साहन म्हणून अनेक स्वदेशी कंपन्यांना त्यांनी जाहिरातीतून मनापासून मदत केली. परदेशी राजवटीत स्वदेशी कारखाने स्थापन व्हावेत, त्यांची भरभराट व्हावी ही त्यांची मनापासून इच्छा होती. शंभरहून अधिक भारतीय उत्पादनांच्या जाहिरातीसाठी त्यांनी अभिप्राय किंवा संदेश लिहून दिले होते. गंमत म्हणजे स्नो, डोक्याला लावायचे क्रीम आणि तेल यांची सुद्धा जाहिरात रवींद्रनाथ यांनी केली होती.

कुंतलिन या तेलाची जाहिरात, "आम्ही ठाकूर कुटुंब गेले दोन महिने कुंतलिन हेयर ऑईल वापरत आहोत. माझ्या एका नातेवाईकाचे केस फार गळत होते पण आता कुंतलिन तेल वापरायला सुरुवात केल्यापासून त्याच्या डोक्यावर केस उगवायला लागले आहेत. हे तेल सुगंधी आहे आणि हा सुगंध बराच काळ टिकतो" या शब्दांमध्ये केली होती.



**७ मे हा रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त...**

कलकत्त्यातल्या जलयोग मिष्ठान्न भांडारच्या मिठाया त्यांच्या आवडत्या होत्या. या दुकानाच्या जाहिरातीसाठी त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात मजकूर लिहून दिला होता आणि तो मजकूर दुकानदाराने फ्रेम करून दुकानात लावला होता. "जलयोग मिष्ठान्न भांडारच्या मिठाया मी अनेक वर्षे चाखतो आहे. दरवेळी इथली मिठाई खाल्ल्यावर मी तृप्त होतो. या दुकानातल्या मिठाया अप्रतिम आहेतच, पण इथले दही सुद्धा फार चविष्ट आहे, म्हणून मला इथे यायला आवडते."

त्याकाळी रेडियम लेबॉरटीने काही सौंदर्य प्रसाधने बाजारात आणली होती. या कंपनीच्या संचालकांनी रवींद्रनाथांना गळ घातली आणि रवींद्रनाथांना त्यांना नकार देणे शक्य झाले नाही म्हणून त्यांनी त्यांना जाहिरात लिहून दिली. "स्नो आणि क्रीम आणि ओ-द- कोलॉईन वापरण्याची सवय असणाऱ्यांना रेडियम लेबॉरटीची उत्पादने अत्यंत आवडतील. या स्वदेशी उपक्रमास पाठिंबा देणे हे मी माझे कर्तव्य समजतो." त्यांच्या सगळ्या जाहिरातींमध्ये त्यांचे देशप्रेम दिसून येते. तरी पण १९३७ साली बोर्नव्हिटासारख्या परदेशी कंपनीची जाहिरात रवींद्रनाथांनी केली होती. शांतिनिकेतनला नेहमीच आर्थिक चणचण होती. त्यासाठी त्यांनी ही जाहिरात केली असावी. या जाहिरातीत त्यांचा फोटो आणि खाली इंग्रजीत त्यांची सही, सहीखाली विख्यात कवी, नाटककार रवींद्रनाथ ठाकूर असे छापले होते. ही जाहिरात तेव्हाच्या आनंद बाजार पत्रिका आणि द स्टेट्समन या प्रसिद्ध वर्तमानपत्रात प्रकाशित झाली होती.

विशेष म्हणजे जाहिरातींसाठी त्यांनी इंग्रजी शब्दांना बंगाली प्रतिशब्द तयार केले होते. पेनसाठी झरनी किंवा झरनाकलम हे शब्द तयार केले होते. पुढे झरनी हा शब्द बंगालीत लोकप्रिय झाला. शाईसाठी त्यांनी आजन्म काली किंवा काजल काली अशी दोन गमतीदार नावे सुचवली होती.

दालमिया उद्योगाला प्रोत्साहन म्हणून अनेक जाहिराती त्यांनी लिहून दिल्या होत्या आणि फोटोदेखील दिले होते. स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन म्हणून जाहिराती लिहून देणारे रवींद्रनाथांचे पुढे अनेक व्याप वाढले. त्यांच्या व्यग्र आयुष्यात जाहिराती लिहून देणे त्यांना त्रासदायक वाटू लागले.

आपली ही व्यथा त्यांनी आपल्या विजयलाल चटोपाध्याय या मित्राजवळ पत्रातून व्यक्त केली होती- "अभिप्राय लिहिणे, जाहिराती लिहिणे, पुस्तकांच्या प्रस्तावना लिहिणे हे सारे मला थकवणारे आहे... पण मला हे काम करायलाच हवे. लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. मी जर अभिप्राय लिहिले नाही तर या स्वदेशी उद्योगांना कोण पाठिंबा देईल?"

आजच्या केवळ पैशांसाठी जाहिराती करणाऱ्या युगात देशप्रेमासाठी थकवा येईपर्यंत जाहिरात लिहून देणाऱ्या रवींद्रनाथांचे त्यांच्या जन्मदिनी स्मरण करणे, या लेखाच्या निमित्ताने त्यांना पुन्हा समजून घेणे औचित्यपूर्ण ठरावे!

९४२०३९७५५९

## वेध

# फसव्या कॉल्सचा सापळा!

**नंदकिशोर काथवटे**

देशात सध्या आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यवहार सोपे झाले, पण त्याचबरोबर गुन्हेगारांनाही नवे मार्ग सापडले. कर्जमाफी, पॉलिसी मॅच्युअर, इन्व्हेस्टमेंट परतावा अशा आमिषांनी सामान्य माणसांना जाळ्यात ओढले जात आहे. अलिकडे तर लोकांच्या मोबाईलवर येणारे कॉल, मेसेज किंवा सोशल मीडियावरील जाहिराती यांच्यामार्फत फसवणूक करण्याचे प्रकार राजरोस सुरू आहेत. याबाबत केंद्रीय बँकेनेही वारंवार इशारा दिला असतानाही अनेक जण अजूनही या जाळ्यात अडकत आहेत. फसवणुकीचे प्रकार आणि फसवणूक करणारेही दिवसेंदिवस अधिक चतुर होत चालले आहेत. तुमच्या खात्यात चुकून पैसे जमा झाले आहेत असा खोटा मेसेज दाखवून लोकांकडून पैसे परत करून घेण्याचा प्रकार, पॉलिसी बंद होणार आहे म्हणून घाईघाईने हप्ते भरायला लावणे किंवा ऑनलाईन ऑर्डर अडकली आहे म्हणून अतिरिक्त रक्कम भरण्यास भाग पाडणे हे सगळे प्रकार केवळ लोकांच्या विश्वासावर चालतात. एका क्षणाचा निष्काळजीपणा आयुष्यभराची बचत गमावू शकतो, ही वस्तुस्थिती आता सर्वांनी समजून घ्यायला हवी.

विशेषतः कर्जमाफी या नावाखाली होणारी फसवणूक अधिक धोकादायक ठरत आहे. अनेक शेतकरी, लघुउद्योजक किंवा कर्जबाजारी नागरिकांना फोन करून तुमचे कर्ज माफ झाले आहे, फक्त प्रोसेसिंग फी भरा असे सांगितले जाते. काही वेळा बनावट कागदपत्रे, सरकारी शिक्के आणि बनावट वेबसाईट्स दाखवून विश्वास निर्माण केला जातो. प्रत्यक्षात कोणतीही सरकारी कर्जमाफी योजना ही अधिकृत घोषणांद्वारे आणि बँकांच्या माध्यमातूनच राबवली जाते, वैयक्तिक फोन किंवा मेसेजद्वारे नाही. त्यामुळे अशा कॉल्सवर विश्वास ठेवणे म्हणजे स्वतःहून फसवणुकीला आमंत्रण देण्यासारखे आहे. या पृष्ठभूमीवर नागरिकांनी काही मूलभूत पथ्ये पाळणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वप्रथम, कोणत्याही अनोळखी कॉल किंवा मेसेजवर विश्वास ठेवू नये. बँक, विमा कंपनी किंवा सरकारी संस्था कधीही फोनवरून ओटीपी, पासवर्ड किंवा खातेविषयक माहिती मागत नाहीत, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कोणतीही आर्थिक व्यवहाराची लिंक क्लिक करण्याआधी तिची खातरजमा करावी. जलद नफा किंवा मोठा फायदा अशा आमिषांना बळी पडणे टाळावे. व्यवहार करताना अधिकृत ॲप्स आणि सुरक्षित वेबसाईट्सचाच वापर करावा. ऑनलाईन खरेदी करताना देखील सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. अज्ञात वेबसाईट्सवरून खरेदी करणे टाळावे, तसेच 'ॲडव्हान्स पेमेंट' मागणाऱ्या संशयास्पद विक्रेत्यांपासून दूर राहावे. कुरिअर अडकल्याच्या नावाखाली पैसे मागितले गेले, तर प्रथम संबंधित अधिकृत कंपनीशी संपर्क साधून खात्री करावी. प्रत्येक व्यवहारानंतर बँकेचे एसएमएस किंवा ॲप नोटिफिकेशन नीट तपासणे आणि काही संशयास्पद दिसल्यास तत्काळ बँकेशी संपर्क साधणे ही सवय लावावी. रिझर्व्ह बँकेनेही नागरिकांसाठी काही स्पष्ट आणि कडक सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारच्या कर्जमाफी, लॉटरी, इनाम किंवा गुंतवणूक दुप्पट अशा ऑफर्सवर विश्वास ठेवू नये, असे वारंवार सांगण्यात आले आहे. बँक कधीही ग्राहकांकडून ओटीपी, सीव्हीसी किंवा इंटरनेट बँकिंग पासवर्ड मागत नाही, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याशिवाय, संशयास्पद कॉल्स किंवा व्यवहार तत्काळ अधिकृत हेल्पलाईनवर कळवणे, तसेच सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेने नो युअर कस्टमर (केवायसी) प्रक्रियेच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचाही इशारा दिला आहे. यासोबतच, डिजिटल व्यवहार करताना दोन-स्तरीय सुरक्षा वापरणे, मोबाईलमध्ये अनोळखी ॲप्स डाऊनलोड न करणे आणि सार्वजनिक वाय-फायवर आर्थिक व्यवहार टाळणे या बाबींचाही विशेष उल्लेख करण्यात आला आहे. फसवणूक झाल्यास घाबरून न जाता तत्काळ बँक खाते ब्लॉक करणे, कार्ड बंद करणे आणि अधिकृत तक्रार नोंदवणे हे नुकसान कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरते. फक्त नागरिकांनीच नव्हे, तर शासनानेही या समस्येकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके अधिक सक्षम करणे, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि जलद कारवाई करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केल्यास लोकांमध्ये जागरूकता वाढेल. याशिवाय, फसवणूक करणाऱ्या कॉल सेंटर्सवर कठोर कारवाई करून त्यांची साखळी तोडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शेवटी एकच लक्षात ठेवले पाहिजे की, मोबाईलवरील प्रत्येक कॉल हा संधी नसतो, तो कधी कधी सापळाही असू शकतो. विचारपूर्वक घेतलेला निर्णयच तुमची आयुष्यभराची कमाई सुरक्षित ठेवू शकतो.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# विजय यांच्यासमोरचे आव्हान


**श्यामकांत जहागीरदार**

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीत सर्वांत अनपेक्षित आणि धक्कादायक निकाल तामिळनाडूचा लागला. राज्यातील प्रस्थापित प्रादेशिक पक्षांना मागे टाकत लोकप्रिय चित्रपट अभिनेते जोसेफ विजय चंद्रशेखर यांच्या तमिळगा वैत्री कळघम (टीव्हीके) या पक्षाने सत्ता मिळविली. कोणत्याच एक्झिट पोलमधून तामिळनाडूत विजय यांच्या पक्षाला बहुमत मिळणार असल्याचे संकेत मिळाले नव्हते. दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या टीव्हीके पक्षाला बहुमतापासून १० जागा कमी मिळाल्या असल्या, तरी त्या पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे सरकार त्या पक्षाचेच बनणार हे नक्की आहे. विजय यांनी पहिल्याच झटक्यात विजयाची शिटी मारली; शिटी हे त्यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. विजय यांच्या शिटीमुळे द्रमुकचा राज्यातील सत्तेचा सूर्य मावळला. 'उगवता सूर्य' हे द्रमुकचे निवडणूक चिन्ह आहे.

टीव्हीकेच्या या एकहाती यशाचे शिल्पकार विजयच आहेत, यात शंका नाही. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी विजय यांच्या पक्षाला अन्य काही पक्षाचा पाठिंबा घ्यावा लागणार आहे. प्रचारसभातून विजय यांनी द्रमुक आणि भाजपावर जोरदार हल्ला चढवला होता; मात्र काँग्रेस आणि अण्णाद्रमुकवर त्यांनी फारशी टीका केली नव्हती. सरकार स्थापन करण्यासाठी विजय यांच्या पक्षाला काँग्रेसने पाठिंबा देऊ केला आहे.

तामिळनाडूत १९६७ पासून राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव संपला आणि द्रमुक आणि अण्णाद्रमुकचे युग सुरू झाले. त्यानंतर आजपर्यंत त्या राज्यात आलटून-पालटून द्रमुकचे वा अण्णाद्रमुकचे सरकार येत होते. काँग्रेस आणि नंतर भाजपालाही त्या राज्यात कधी द्रमुक आणि कधी अण्णाद्रमुकचे बोट पकडून आपले राजकारण करावे लागले, हा इतिहास आहे. राज्यातील जनतेने यावेळी दोनही प्रादेशिक पक्षांना झिडकारत तिसऱ्या पण नव्याकोऱ्या पर्यायाला आपली पसंती दिली आहे.

विजयाच्या लाटेत मावळते मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचाही पराभव झाला. मुख्यमंत्रिपदावर असताना पराभव पत्करावा लागणारे स्टॅलिन हे तिसरे मुख्यमंत्री आहेत. याआधी जयललिता आणि अण्णादुराई या दोन मुख्यमंत्र्याचा पदावर असताना पराभव झाला होता. यावेळच्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीत तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा पराभव झाला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन्, तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अशा तीन मुख्यमंत्र्यांचा पराभव झाला. फक्त भाजपाशासित राज्यांचे दोन मुख्यमंत्री या निवडणुकीत विजयी झाले. आसामचे हिमंता बिस्व सरमा आणि पुद्दुचेरीचे एन. रंगासामी हे ते भाग्यवान मुख्यमंत्री आहेत. भाजपा आपल्या ताब्यातील आसाम आणि पुद्दुचेरी या दोन राज्यांतील सत्ता कायम ठेवत पश्चिम बंगाल या तिसऱ्या राज्यातील सत्ता हिसकावून घेण्यात यशस्वी ठरली आहे.



तामिळनाडूच्या जनतेला चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्यांचे जबरदस्त वेड आहे. चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्यांनी काढलेल्या राजकीय पक्षांना राज्यातील जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आणि अभिनेत्री यांनी राज्यातील जनतेच्या मनावर अनेक वर्षे राज्य केले आहे. द्रमुकचे संस्थापक असलेले सी. एन. अण्णादुराईही तामिळ चित्रपटातील लोकप्रिय अभिनेते होते. राज्याचे मुख्यमंत्रिपद सर्वाधिक काळ भूषवलेले करुणानिधीही तामिळी चित्रपटातील लोकप्रिय नायक होते. त्यांच्या प्रतिस्पर्धी अण्णाद्रमुकचे एम. जी. रामचंद्रन नायक होते तर जयललिता तामिळ चित्रपटातील लोकप्रिय नायिका होत्या. या चौघांनीही तामिळनाडूचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. त्या मालिकेत आता विजय यांचा समावेश झाला आहे. तामिळनाडूच्या राजकारणातील बहुतांश नेते हे चित्रपट उद्योगाशी संबंधित होते. १९८० च्या दशकात स्टॅलिन यांनी तामिळी चित्रपटातून काम केले. १९९० च्या दशकात अनेक तामिळी मालिकातूनही त्यांनी अभिनय केला. द्राविडी विचारधारा आणि तामिळी राष्ट्रवाद यांचा संगम साधत विजय यांनी हा विजय मिळविला आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये विजय यांनी आपल्या नवीन राजकीय पक्षाची स्थापना केली. पण त्या आधीपासूनच विजय मक्कल इयक्कम या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राज्यात सक्रिय होते. पक्ष स्थापन केल्यानंतर दोन वर्षांत सत्ता मिळवत विजय यांच्या पक्षाने आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांच्या तेलगू देसम यांच्या पक्षाशी बरोबरी केली आहे. तेलगू देसमची स्थापना झाल्यानंतर दोन वर्षांतच रामाराव यांनी राज्यातील सत्ता हस्तगत केली होती.

राज्यात चित्रपट अभिनेत्यांनी राजकीय पक्षाची स्थापना करण्याची परंपरा राहिली आहे. मात्र यातील सर्वच अभिनेत्यांना यश मिळाले असे नाही. यावेळी स्टॅलिन यांच्या सरकारविरुद्ध असलेल्या असंतोषाचा विजय यांनी चांगला उपयोग करून घेत राज्यातील जनतेला आपल्या बाजूला वळवत उल्लेखनीय यश मिळविले आहे. राज्यातील तरुण आणि महिलांनी विजय यांच्या पक्षाच्या विजयात मोठा वाटा उचलला.

विजय यांच्या प्रचारसभांना राज्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. प्रचारसभांना होत असलेली गर्दी मतपेटीत परिवर्तित करण्यात विजय यांना यश आले. तामिळ चित्रपटसृष्टीत दंतकथा बनलेले लोकप्रिय नेते रजनीकांत यांनीही राजकीय पक्ष स्थापन करत २०२१ ची विधानसभा निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला. पण आपल्या अफाट लोकप्रियतेचा राजकीय फायदा करून घेण्यात ते अपयशी ठरले. राज्यातील आणखी एक लोकप्रिय अभिनेते कमल हसन यांनीही राजकारणात शिरण्याचा प्रयत्न केला. २०१८ मध्ये मदुराई येथे त्यांनी मक्कल निधी मय्यम या राजकीय पक्षाची स्थापना केली, पण त्यांच्या पक्षालाही निवडणुकीत अपेक्षित यश मिळू शकले नाही. विजय यांनी रजनीकांत आणि कमल हसन सारख्या लोकप्रिय अभिनेत्यांनी राजकारणात येताना केलेल्या चुकांचा आढावा घेत त्या दुरुस्त केल्या. राजकीय पक्षाची स्थापना करण्याआधी त्यांनी एका संघटनेच्या माध्यमातून समाजकारण करत लोकांचा विश्वास जिंकला. त्यामुळेच त्यांना हे यश मिळाले आहे.

एका प्रचारसभेत लोकांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी होत ४० जणांचा मृत्यूही झाला होता. या प्रकरणी आयोजकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणाची सीबीआय चौकशीही सुरू आहे. तरीसुद्धा विजय यांच्या नेतृत्वावरचा राज्यातील जनतेचा विश्वास कमी झाला नाही. लाडकी बहीण योजनेप्रमाणे विजय यांच्या पक्षाने महिलांना दिलेली आश्वासने त्यांच्या विजयाचा आधार ठरला. राज्यातील महिलांना आठ ग्राम सोने तसेच महिलांना दरमहा दोन हजार रुपये देण्याचे आश्वासन विजय यांच्या पक्षाने दिले आहे. राज्यातील महिलांनी त्यांच्या पक्षाला जी भरभरून मते दिली, त्याचे मूळ या आश्वासनात दडले आहे.

१९९४ पासून विजय यांनी 'इलया थलपती' ही पदवी वापरायला सुरुवात केली होती. इलया थलपती म्हणजे युवा सेनापती. थलपतीनंतर विजय यांचा प्रवास 'थलायवन'च्या दिशेने सुरू झाला होता. थलायवन म्हणजे नेता. थलायवननंतर विजय यांनी 'मुथलवार' म्हणजे मुख्यमंत्रिपदावर झेप घेतली. अनिल कपूर त्यांच्या एका गाजलेल्या हिंदी चित्रपटात एक दिवसाचे मुख्यमंत्री झाले होते. एक दिवसाचा मुख्यमंत्री होण्यापेक्षा पाच वर्षे मुख्यमंत्री होणे आणि मुख्यमंत्रिपद सांभाळणे किती कठीण असते,

याचा अनुभव आता विजय यांना येईल. विजय यांना चित्रपटात अभिनय करण्याचा अनुभव असला तरी सरकार चालविण्याचा अनुभव नाही. विजय आणि त्यांचे सर्वच सहकाऱ्यांची पाटी ही प्रशासकीय अनुभवाबाबतीत कोरी आहे. सरकार चालविणे हे वाटते तितके सोपे नसते. नोकरशाही ही नाठाळ घोड्यासारखी असते, तिच्यावर मांड ठोकून बसणे हे अतिशय आव्हानात्मक असते, याचा अनुभव आता विजय यांना येईल.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### डेक्कनमधील रेल्वे आरक्षण केंद्र बंद होऊ नये

काल रेल्वे आरक्षण करण्यासाठी डेक्कन जिमखान्यावरील रेल्वे आरक्षण केंद्रात पोहोचलो. तर त्या ठिकाणी "तांत्रिक कारणामुळे, पुढील सूचना मिळेपर्यंत आरक्षण केंद्र बंद राहील" असा फलक लावून केंद्र बंद ठेवण्यात आले होते. मग तेथे अधिक चौकशी केली असता समजले की, काही दिवसांपासून हा फलक येथे लावण्यात आला असून आरक्षण केंद्र बंद आहे. एक शंका मनात आली की, तांत्रिक कारण दुरुस्त व्हायला एवढा कालावधी का लागत आहे? की हे आरक्षण केंद्र बंद करण्याचा विचार रेल्वे खाते करीत आहे! अत्यंत मध्यवर्ती ठिकाणी असणारे व सर्व भागांतील नागरिकांना सोईचे असलेले हे डेक्कन जिमखाना येथील रेल्वे आरक्षण केंद्र कोणत्याही परिस्थितीत बंद होता कामा नये. रेल्वे प्रवासी संघटना व लोकप्रतिनिधी यांनीही हे आरक्षण केंद्र बंद होऊ नये म्हणून पाठपुरावा करावा ही विनंती.

**मोहन रानडे**/कोथरूड, पुणे

### फुटपाथ मोकळे करावे

नागपूर शहरातील सर्व फुटपाथ लहान व्यापाऱ्यांनी ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडे येणारे ग्राहक आपले वाहन तिथेच उभे करतात, त्यामुळे पादचाऱ्यांना कुठून चालायचे कळत नाही. परिणामी अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रशासनाने आयटी पार्क लक्ष्मी नगर, बजाज नगर या भागाकडे लक्ष द्यावे. जेणेकरून पादचारी फुटपाथ चालण्यासाठी वापरू शकतील असे वाटते.

**विजय देशपांडे**/नागपूर

### अमली पदार्थांचा विषारी विळखा

जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी नुकतेच काश्मीर विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वुशू अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करताना खेळाडूंनी नशामुक्त अभियानाचे दूत म्हणून काम करावे व तरुणांना अमली पदार्थांपासून दूर राहून खेळांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करावे असे आवाहन केले. त्यावरून देशातील तरुण पिढी ड्रग्स व तत्सम अमली पदार्थांच्या किती आहारी गेली आहे याचे गांभीर्य समजून येते. केवळ खेळाडूंनी असे अभियान चालविण्याबरोबरच राज्य सरकार व प्रशासन यांनी देखील तरुण पिढीच्या गळ्याभोवतीचा हा अमली पदार्थांचा विषारी विळखा नष्ट करण्यासाठी; सर्व संबंधित शहरात जिथे हे ड्रग्स निर्मितीचे कारखाने समाजकंटक चालवीत आहेत ते शोधून काढून नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच अमली पदार्थांची तस्करी जिथून चालते त्याचा शोध घेऊन तेथील संबंधितांच्या मुसक्या आवळणे आवश्यक झाले आहे. सुशिक्षित व उच्चशिक्षित बेकारीच्या नैराश्यातून अमली पदार्थाचे सेवन करण्याच्या घातक सवयीला तरुण मुले-मुली बळी पडतात. त्यामुळे अशा नैराश्यात जगत असलेल्या तरुणांना त्यांच्या पालकांकडून, समाजसुधारकांकडून व शासन, प्रशासनाकडून त्यांच्या समस्येचे निराकरण, योग्य मार्गदर्शन व प्रबोधन आवश्यक आहे. अन्यथा अनेक प्रकारच्या समाज विघातक समस्येबरोबरच हा अमली पदार्थ सेवनाचा तरुणांच्या गळ्याभोवतीचा विषारी विळखा; राष्ट्राचे आधारस्तंभ असलेले तरुण, कुटुंबे व समाज व पर्यायाने राष्ट्राला घातक ठरेल याचे गांभीर्य समजावे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

### सामाजिक जाणीव बदलायला हवी!

आज आपण २१ व्या शतकात प्रगतीची शिखरे पादाक्रांत करत असताना, दुसरीकडे चिमुकल्यांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या ऐकून माणुसकी मेली आहे का? असा काळजाला चिरणारा प्रश्न उभा राहतो. बाल अत्याचार ही केवळ गुन्हेगारी नसून ती एक मानसिक विकृती आहे, जिचा नायनाट करण्यासाठी केवळ कायद्याची भीती पुरेशी नाही, तर समाजाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल घडवणे ही काळाची गरज आहे. शाळांमधून मुलांना गुड टच-बॅड टच (चांगला आणि वाईट स्पर्श) यातील फरक शिकवणे हे एक महत्त्वाची सकारात्मक पाऊल आहे. मात्र, ही जबाबदारी केवळ शाळांची नाही. पालकांनी आपल्या मुलांशी मैत्रीचे नाते जपले पाहिजे. मुलांना शरीराच्या खाजगी अवयवांची शास्त्रीय माहिती देऊन नाही म्हणण्याची ताकद त्यांच्यात निर्माण करायला हवी. अनेकदा भीतिपोटी मुले गप्प राहतात; अशा वेळी "काहीही झाले तरी तुझे आई-बाबा तुझ्या पाठीशी आहेत" हा विश्वास त्यांना सुरक्षित ठेवू शकतो. दुसरीकडे, तंत्रज्ञानाच्या युगात मुलांच्या इंटरनेट वापराकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. सायबर जगातील धोके ओळखून पालकांनी मुलांशी संवाद वाढवला पाहिजे. लैंगिक शिक्षणाकडे एक गरज म्हणून पाहिले गेले, तर मुलांच्या मनात निर्माण होणारे चुकीचे कुतूहल शमवता येईल आणि त्यांना स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम करता येईल. मुले हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांचे बालपण ओरबाडणाऱ्या विकृतीला आळा घालण्यासाठी घर, शाळा आणि समाज या तिन्ही स्तरांवर एकजूट व्हावे लागेल.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४४८८३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अंबड प्रशासनाचा वाळू माफियांना मोठा दणका

## 'केणी'द्वारे वाळू चोरी करणाऱ्या १५ मुख्य सूत्रधारांसह साथीदारांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्या संघटित वाळू माफियांविरुद्ध महसूल विभागाने आता निर्णायक मोहीम उघडली आहे. नदीपात्रात पाणी असल्याचा फायदा घेऊन बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील माफिया 'केणी' आणि दोरखंडांच्या साहाय्याने अंबड हद्दीतून वाळू चोरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी शहागडचे मंडळ अधिकारी *नारायण बामनावत* यांच्या फिर्यादीवरून *गोंदी पोलीस ठाण्यात* १५ मुख्य सूत्रधारांसह त्यांच्या इतर अज्ञात साथीदारांवर विविध कलमान्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून गेवराई तालुक्यातील वाळू तस्कर गोदावरी नदीपात्रात पाणी असल्याचा गैरफायदा घेत होते. बीडच्या हद्दीतून नदीपात्रात लांबवर दोरखंड टाकून, 'केणी' (वाळू उपसा करण्याचे साधन) द्वारे अंबड तालुक्याच्या हद्दीतील वाळू ओढून नेली जात होती. यापूर्वी प्रशासनाने १८, १९ आणि २२ एप्रिल रोजी अचानक धाडी टाकून अनेक केण्यांचे दोरखंड कापून जाळून नष्ट केले होते. मात्र, या कारवाईचा तस्करांवर परिणाम न झाल्याने आणि त्यांनी पुन्हा मोठ्या प्रमाणावर यंत्रणा (जेसीबी, पोकलेन, हायवा) लावून शासकीय मालमत्तेची लूट सुरू केल्याने ही कडक पाऊले उचलण्यात आली आहेत.

गोपनीय तपासातून सूत्रधारांची नावे निष्पन्न: नदीत पाणी असल्यामुळे तस्करांच्या वाहनांपर्यंत पोहोचणे महसूल पथकास कठीण जात होते ीशी ळपषे. त्यामुळे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या सूचनेनुसार गोपनीय सूत्रांकडून आणि तलाठी पथकाकडून (श्री गवारे व कृष्णा देशमुख) सविस्तर माहिती गोळा करण्यात आली. या चौकशीतून वाळू चोरी करणाऱ्या १५ मुख्य आरोपींची नावे समोर आली आहेत: माळस पिंपळगाव (ता. गेवराई):हरी रघुनाथ सुखदेव, अंकुश पवार, वैभव डाके, शिवाजी पंडित डाके, रमेश सुखदेव, राजेंद्र बाबुराव डाके, किरण डाके, अशोक सुखदेव, रवी टेकाळे, पवन पठाडे, अजय पठाडे आणि प्रवीण राऊत, सावळेश्वर येथील बंटी उदे आणि मुकेश कुटे, भांबेरी (ता. अंबड) येथील शाहरुख अनवर शेख. यांव्यतिरिक्त राक्षसभुवन व सुरळेगाव येथील त्यांचे इतर साथीदारही या संघटित गुन्हेगारीत सामील आहेत.

### वरिष्ठ प्रशासनाचे नियोजन आणि कडक इशारा

सदर कारवाई जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय दंडाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. या माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी आणि त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सविस्तर अहवालही पाठवण्यात आला आहे.

**–तहसीलदार विजय चव्हाण**

---

### आ.लोणीकरांकडून मंदिरासाठी १ लाख रुपयांची देणगी

# आष्टीत संत लक्ष्मण महाराज मंदिर भूमिपूजन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

## आ.बबनराव लोणीकरांची प्रमुख उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे श्री संत लक्ष्मण महाराज गाथा व महाकालेश्वर शिव मंदिर या भव्य मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या सोहळ्यास श्रीमद उज्जैन उजनी श्रीधर्माशिहात सिंहासनाधीश्वर श्री श्री १००८ जगद्गुरु सिद्धलिंग राज देशी केंद्र शिवाचार्य महास्वामीजी उजनी पीठ कर्नाटक, श्रीमद ज्ञान सिंहासनाधीश्वर श्री श्री १००८ जगद्गुरु मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी वाराणसी तसेच श्री शब्द १०८ वेदांताचार्य शिवाचार्य रत्न सद्गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर उपस्थित होते. विविध संत-महंत, धर्मगुरू, ग्रामस्थ आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वैदिक मंत्रोच्चारात धर्मगुरूंच्या हस्ते मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. संत लक्ष्मण महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. यावेळी बोलताना आ. बबनराव लोणीकर यांनी संत लक्ष्मण महाराजांच्या कार्याचा गौरव करत समाजामध्ये अध्यात्म, संस्कार आणि हिंदुत्वाची जागृती निर्माण करण्यात त्यांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. या ठिकाणी उभारण्यात येणारे मंदिर आणि मठ भविष्यात भाविकांसाठी श्रद्धास्थान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साखरखेर्डा येथील सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात विविध विकासकामे करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. परिसरात रस्ते, पेव्हर ब्लॉक, भाविकांसाठी सुविधा तसेच सिद्धेश्वर मंदिरासाठी ३० लाख रुपयांचा सभामंडप उभारण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. भाविकांच्या पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी १७ लाख रुपयांचा आरओ फिल्टर बसवण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. संत लक्ष्मण महाराज हे दैवी शक्तीचे प्रतीक असून त्यांच्या स्मरणार्थ उभारले जाणारे हे भव्य मंदिर परिसराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणारे ठरेल, असेही त्यांनी सांगितले. भाषणादरम्यान त्यांनी ऐतिहासिक संदर्भ देत पूर्वी संत लक्ष्मण महाराजांच्या मिरवणुकीवर दगडफेक झाली होती, मात्र त्या कठीण काळातही महाराजांनी हिंदुत्वाची ज्योत प्रज्वलित ठेवली, असे सांगितले. त्यामुळे आज या भागात धार्मिक जागृती आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या २५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत आमदार आणि मंत्री म्हणून काम करताना सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या आशीर्वादामुळे अनेक विकासकामे करता आली, असेही त्यांनी सांगितले. मंदिराचे काम पूर्ण होईपर्यंत ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. तसेच शेगाव ते पंढरपूर या सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या दिंडी मार्ग प्रकल्पाचाही त्यांनी उल्लेख केला. या मार्गामुळे वारकरी, भाविक आणि ग्रामीण भागाच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आ. बबनराव लोणीकर यांनी मंदिर बांधकामासाठी स्वतः १ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. त्यांच्या या घोषणेनंतर उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. या प्रसंगी गणपत आप्पा सातपुते, सुमंतराव पाटील, नारायण पळसे, अशोक चोंड, डॉ. कापसे, आवटी साहेब, उमरे, डॉ. विष्णू भुरकवडे, प्रमोद वीर, बबलू सातपुते, हालगे साहेब, साखरे आप्पा, सदाशिव पाटील, बिडकर आप्पा, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष बबलू सातपुते तसेच लिंगायत समाजाचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# संक्षिप्त

## तरुणीचे अश्लील फोटो काढून धर्मांतरासाठी दबाव

### पारध पोलीसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**पारध । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस ठाणे हद्दीत एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणीचे अश्लील फोटो काढून तिला धमकावत धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आणि तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप समोर आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी शेख इम्रान शेख हबीब याने तिचे अश्लील फोटो काढले आणि ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केले. इतकेच नव्हे, तर तिला नमाज पढण्यास भाग पाडणे, बुरखा परिधान करण्याचा दबाव टाकणे अशा प्रकारे धर्मांतरासाठी मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. तसेच आरोपीने तरुणीला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिचा गैरफायदा घेतल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणी तरुणीने धैर्याने पुढे येत पारध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी शेख इम्रान शेख हबीब याच्यासह त्याच्या कुटुंबातील एकूण चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, मुख्य आरोपी शेख इम्रान आणि त्याच्या भावाला पोलिसांनी अटक केली असून इतर संशयितांचा शोध सुरू आहे. या घटनेचा तपास सखोलपणे केला जात असून, संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा विश्वास पोलीस अधीक्षकाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, समाजात अशा विकृत प्रवृत्तींचा वाढता धोका अधोरेखित झाला आहे. नागरिकांनीही अशा घटनांविरोधात सजग राहून पीडितांना साथ देण्याची गरज व्यक्त होत आहे

## जालना जिल्ह्यातील ६५ कोतवाल व पोलीस पाटील आपदा मित्र प्रशिक्षणासाठी कोलाडकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या काळात गावपातळीवर तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील ६५ कोतवाल व पोलीस पाटील यांना आपदा मित्र योजनेअंतर्गत विशेष निवासी प्रशिक्षणासाठी रायगड जिल्ह्यातील कोलाड येथे रवाना करण्यात आले आहे. ही योजना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (छऊच–) अंतर्गत राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

गावपातळीवरील प्रशासनात कोतवाल व पोलीस पाटील हे अत्यंत महत्त्वाचे घटक असून आपत्तीच्या वेळी नागरिकांपर्यंत सर्वप्रथम पोहोचणारे प्रतिनिधी म्हणून त्यांची भूमिका निर्णायक ठरते. याच पार्श्वभूमीवर त्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे सखोल व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जात आहे.जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधून या प्रशिक्षणासाठी सहभाग नोंदविण्यात आला आहे. त्यामध्ये जालना (०८), बदनापूर (०४), भोकरदन (०६), जाफ्राबाद (०६), परतूर (०७), मंठा (०३), अंबड (१९) आणि घनसावंगी (१२) अशा एकूण ६५ प्रशिक्षणार्थींचा समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या प्रशिक्षित कोतवाल व पोलीस पाटील यांचा जिल्हा आपत्ती प्रतिसाद यंत्रणेत आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार असून ग्रामस्तरावर आपत्ती सज्जता निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक काजळकर तसेच नायब तहसीलदार निलम लुणावत यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देऊन हिरवी झेंडी दाखवत त्यांना प्रशिक्षणासाठी रवाना केले.

---

# रामतीर्थ स्मशानभूमीजवळील कुंडलिका नदीत मृत कोंबड्यांचा खच; परिसरात दुर्गंधीचा कहर



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कुंडलिका नदीचे विदारक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. रामतीर्थ स्मशानभूमीजवळील जालना–छत्रपती संभाजीनगर रोडवरील पुलाखाली शेकडो मृत कोंबड्यांचा खच पडलेला आढळून आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पुलाखाली तब्बल १५० ते २०० मृत कोंबड्या टाकण्यात आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, भरदिवसा कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या गाड्या नदी परिसरात उभ्या राहत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. अज्ञात व्यक्तींनी मृत कोंबड्या थेट नदीपात्रात फेकल्याने नदीतील पाणी दूषित झाले असून पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावरून ये–जा करणाऱ्या वाहनचालकांना देखील असह्य दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

---

# परतूर शहरातील मलंगशहा चौकातील देशी दारू दुकान हटवा

## नगरसेवक इजरान कुरेशी यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी




**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर शहरातील गजबजलेल्या मलंगशहा चौक येथील देशी दारूच्या दुकानामुळे सर्वसामान्य नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असून, हे दुकान तत्काळ निवासी वस्तीतून स्थलांतरित करावे, अशी मागणी नगरसेवक इजरान भैय्या कुरेशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. नगरसेवक इजरान कुरेशी यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जानुसार, मलंगशहा चौक हा शहरातील मुख्य आणि संवेदनशील भाग आहे. या परिसरात मोठी निवासी वस्ती असून जवळच मंदिर, मशीद, दवाखाने आणि मोठी भाजीमंडी (बाजारपेठ) आहे. या ठिकाणी दारू दुकान असल्याने मद्यपींचा वावर वाढला असून, परिसरात वारंवार भांडणे, गोंधळ आणि असामाजिक कृत्ये घडत आहेत. यामुळे सार्वजनिक शांतता धोक्यात आली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सदर चौक हा रहदारीचा मुख्य मार्ग असल्याने येथून शाळा–महाविद्यालयांतील विद्यार्थिनी आणि महिलांची सतत वर्दळ असते. मात्र, दारू दुकानामुळे महिलांना या भागातून जाताना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशा संवेदनशील भागात दारू दुकान असणे हे नियमांचे उल्लंघन असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः दखल घेऊन जायमोक्यावर स्थळपाहणी व पंचनामा करावा आणि हे दुकान लोकवस्तीपासून दूर कायदेशीर ठिकाणी स्थलांतरित करावे, अशी विनंती कुरेशी यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती राज्य उत्पादन शुल्क आयुक्त (मुंबई), विभागीय उपआयुक्त (छत्रपती संभाजीनगर), अधीक्षक (जालना), उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. आता या प्रश्नावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण परतूर शहराचे लक्ष लागले आहे.

---

# एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे




**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे ८ मे रोजी जागतिक थॅलेसेमिया दिन साजरा करण्यांत येतो. या दिवशी थॅलेसेमिया आजाराची समाजामध्ये माहिती, जनजागृती व्हावी हा दृष्टीकोनातुन मार्गदर्शन करण्यांत येतो. थॅलेसेमिया हा आजार रक्ताशी संबंधीत आहे. या वर्षीची थीम 'आता लपुन न राहताः निदान न झालेल्या रुग्णांना शोधणे. दुर्लक्षित रुग्णांना आधार देणे' क्ळववशप छे चीश: ऋळपवळपस ींहश णपवळरसपीशव. डीर्िींळपस ींहश णपीशशप. याची आपण अमंलबजावणी १०० टक्के केली तर निश्चितचं एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे असणारं.

थॅलेसेमिया हा आजार अनुवांशिक आहे. कारण पालकांकडुन मुलांना हा आजार होतो. सामान्य मानवाच्या शरीरामध्ये लाल रक्तपेशींचे आयुष्य १२० दिवस असते. थॅलेसेमिया या आजारामध्ये लाल रक्त पेशींचे आयुष्य २० ते २२ दिवस असते. त्यामुळे थॅलेसेमिया ग्रस्त मुलांचे हिमोग्लोबीन कमी होत असल्यामुळे त्यांना वारंवार रक्त द्यावे लागते. हिमोग्लोबीन कमी होत असल्यामुळे थॅलेसेमिया हा धोकादायक आजार आहे. या आजारापासुन मुक्त होण्यसाठी लस किंवा औषधी उपलब्ध नाही. भारतामध्ये अंदाजे १ लाख थॅलेसेमिया रुग्ण असुन दरवर्षी १०००० रुग्णांची वाढ होते.

लक्षणे : अशक्तपणा, थकवा, नखे, डोळे व जीभ फिकट होणे, त्वचेवर पिवळसर रंग येणे, शारीरिक वाढ मंदावणे, ओटीपोटीत दुखणे.

प्रकार : थॅलेसेमिया या आजाराचे दोन प्रकार मेजर व मायनर आहेत. मेजर या प्रकारामध्ये पती पत्नी या दोघांच्याही गुणसुत्रामध्ये दोष असतो. मायनर या प्रकारामध्ये पती किंवा पत्नी या दोघापैकी एकाच्या गुणसुत्रामध्ये दोष असतो. पालकांच्या गुणसुत्रातील दोषामुळे थॅलेसेमिया हा आजार होतो. याचे रोग निदान रक्त तपासणीद्वारे होते.


उपचार : बोन मॅरो ट्रान्सप्लांट हा एकमेव खर्चिक उपचार आहे किंवा नियमित २० ते २५ दिवसांनी बालकांना बाहेरुन रक्त देणे. तज्ज्ञ वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित उपचार घेणे.

आवाहन : वेळेवर निदान, उपचार आणि प्रतिबंध या त्रिसुत्रीचा वापर करण्यासाठी जनजागृती करु या.

---

# परतूर नगर पालिकेच्या नव्या इमारतीच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह?

## निकृष्ट साहित्य वापरामुळे नागरिकांमध्ये संताप; आ.बबनराव लोणीकर यांच्या स्वप्नातील इमारत धोक्यात येण्याची भीती





**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारी नगर पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारत सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडली असून, संबंधित बांधकामामध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून तब्बल ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता. मात्र, नागरिकांच्या मते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामात संबंधित गुत्तेदाराकडून मोठ्या प्रमाणात मनमानी सुरू असून, त्यामुळे ही इमारत भविष्यात धोकादायक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

परतूर शहरात आधुनिक सुविधा असलेली, प्रशस्त आणि नागरिकाभिमुख नगर परिषद इमारत उभी राहावी, प्रशासन अधिक सक्षम व्हावे तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येला योग्य सेवा मिळाव्यात या उद्देशाने हा निधी मंजूर करण्यात आला होता. या प्रकल्पाकडे नागरिक मोठ्या आशेने पाहत होते. मात्र, प्रत्यक्ष सुरू असलेल्या बांधकामाबाबत आता अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मते, इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारी वाळू, खडी, विटा, सिमेंट तसेच लोखंडी साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, अनेक ठिकाणी बांधकामामध्ये तांत्रिक नियमांचे पालन होत नसल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी सिमेंटचे प्रमाण कमी वापरले जात असल्याची चर्चा असून, बांधकामाचे कॉलम, बीम आणि भिंतींमध्ये दर्जाहीन काम सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भविष्यात ही इमारत सुरक्षित राहील का? असा गंभीर प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे, शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतरही संबंधित कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा प्रत्यक्ष स्थळी पाहणी करत नसल्याचा आरोप देखील होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद प्रशासन आणि तांत्रिक अधिकाऱ्यांची भूमिका देखील संशयाच्या भोवऱ्यात सापडत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, जर वेळेत या बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी झाली नाही तर भविष्यात मोठा आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येऊ शकतो. काही नागरिकांनी तर संबंधित बांधकामाचे स्वतंत्र स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी देखील पुढे आणली आहे.

नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणात तत्काळ लक्ष घालून संबंधित गुत्तेदाराला जाब विचारावा, निकृष्ट साहित्याचा वापर थांबवावा आणि संपूर्ण कामाची गुणवत्ता तपासणी करावी अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. अन्यथा भविष्यात ही इमारत नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारी ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### आमदारांच्या प्रयत्नांना गुत्तेदाराचा सुरुंग?

परतूर शहरासाठी आधुनिक नगर परिषद इमारत उभी राहावी म्हणून आमदार बबनराव लोणीकर यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून तब्बल ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. मात्र, संबंधित गुत्तेदाराच्या मनमानी कारभारामुळे आणि निकृष्ट दर्जाच्या साहित्य वापरामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्पच धोक्यात येत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एस.टी. आरक्षणासाठी नेमलेल्या समितीचा आढावा द्या- गोर सेना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

गेल्या वर्षी गोरबंजारा समाजाला एस.टी.प्रवर्गातून आरक्षण द्या,हैदराबाद गॅझेट लागू करा आदी मागण्यासाठी गोरबंजारा समाजाने महाराष्ट्रभर ५५ महामोर्चे काढले शिवाय गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सनिक उतरवून रास्ता रोको केला व नांदेड रेल्वे रोखण्याचा इशारा दिला होता मात्र राज्यसरकार न सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व बंजारा समाजातील शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा झाली व एसटी आरक्षणासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीन कोणती कामे केली, कोणत्या दिशेने अभ्यास सुरु केला आहे की अजून फक्त कागदापुरतीच समिती सिमित राहिली आहे हे कळत नसल्याने गोरबंजारा समाज आक्रमक झाला असून अभ्यास समितीने पाच महिन्यातील केलेली कामे गोरबंजारा समाजापुढे मांडावीत या मागणीसाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज राज्यभर ३०० पेक्षा अधिक जागेवर निवेदन देण्यात आले आहे.

संपूर्ण भारतातील १४ करोड गोरबंजारा समाजाची जन्मापासून तर मरेपर्यंत स्वतंत्र गोरधाटी असून आदीम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात देशातील अनेक राज्यात त्यांना यामुळेच एस.टी.प्रवर्गातून आरक्षण दिलेले आहे मात्र महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती अ प्रवर्गात सामावेश केलेला आहे.मात्र गोरबंजारा समाजाचे राहणीमान वागणूक, रुढी परंपर,विशिष्ट ठिकाणी तांडा करुन राहणे,गोरबोली, गोरधाटी, पेहराव,आर्थिक मागासलेपण,स्वभावातील लाजबुजरेपणा हे आदिम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात म्हणून त्यांना एसटी प्रवर्गाचा समांतर आरक्षण द्यावे ही गेल्या ७५ वर्षापासूनची मागणी आहे गेल्यावर्षी याच मागणीसाठी राज्यात ५५ पेक्षा अधिक लाखोच्या संख्येने महामोर्चे निघालेत.पाच युवकांनी आपले जिवन संपवून शहीद झालेत.अनेकांनी आमरण उपोषण केले, रास्ता रोको केले.मात्र सरकारने दखल घेतली नाही म्हणून गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सैनिक उतरवून रास्ता रोखला तेव्हा सरकारने सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी बंजारा शिष्टमंडळासोबत चर्चा केली व अभ्यास समिती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीने नेमके कशाचा अभ्यास केला, कोणत्या दिशेने केला, याबाबत समाजाला आजपर्यंत काहीच माहिती दिलेली नाही तेव्हा ही समिती केवळ कागदापुरतीच सिमित तर नाही ना अशी शंका गोरबंजारा समाजात निर्माण झाली असून अभ्यास समितीने आजपर्यंत नेमके काय काय केले हे समजून घेण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना गोरसेनेचे जिल्हाध्यक्ष, जिल्हासचिव,तालुकाध्यक्ष तालुका सचिव तथा गोरसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# देशाच्या विकासाच्यादृष्टीने जनगणना महत्वाची- अरविंद मुंडे

## जनगणना प्रशिक्षणात मुख्याधिकाऱ्यांचे मार्गदर्शन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

देशात विविध कल्याणकारी योजना तसेच देशाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी जनगणना ही महत्वाची असून या राष्ट्रीय कार्यात सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षकांनी सहकार्य करावे. जनगणना काटेकोरपणे करावी असे मार्गदर्शन मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी दिले.

येथील नगर परिषदेच्या सभागृहात मागील तीन दिवसांपासून भारताची जनगणना २०२७ बाबत पर्यवेक्षक आणि प्रगणकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. समोरापीय कार्यक्रमात मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी पर्यवेक्षक आणि प्रगणकांना मार्गदर्शन केले.

जनगणना ही देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची असून या गोळा झालेल्या डेटामधून देशातील गोर-गरीब, मागासवर्गीय तसेच इतर घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना तसेच देशाची परिस्थिती कळते. त्यामुळे प्रगणक आणि पर्यवेक्षकांनी काटेकोरपणे माहीती डिजीटल पध्दतीने गोळा करावी आणि राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. स्व-गणना करण्यासाठी पत्रके, बॅनर्स तसेच भोंग्याद्वारे विविध भागात जनजागृती करण्यात येणार असून नागरिकांनीही स्व गणनेमध्ये सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी केले.

यावेळी प्रशिक्षक पवार, मडावी, परसवाळे यांची उपस्थिती होती. मागील तीन दिवसांपासून सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी डिजिटल पध्दतीने जनगणना होणार असून पर्यवेक्षक व प्रगणक यांना त्यांच्या मोबाईलवर ही जनगणना करावयाची आहे. या जनगणनेचे वैशिष्ट्ये म्हणजे नागरिकांना दि १मे १५ मे पर्यंत स्वगणना करण्यासाठी शासनाने वेबसाईट उपलब्ध करून दिली असून नागरिकांनी स्व गणना करावी असे आवाहन करण्यात आले आहे. तीन दिवसांच्या प्रशिक्षणात पर्यवेक्षक व प्रगणकांना घरोघरी जाऊन इमारत क्रमांक टाकून गणनाघरांची संख्या देखील द्यावयाची आहे. तसेच १५ मे पर्यंत सर्वे करण्यासाठी मिळालेला वार्डाचा नकाशा काढून सादर करावयाचा आहे. या जनगणनेमध्ये पहिल्या टप्प्यात घर आणि मालमत्ता तसेच इतर मुलभूत सोयीसुविधा बाबत ३४ प्रश्न विचारण्यात येणार असून त्याची संपूर्ण नोंद प्रगणकांना त्यांच्या मोबाईलमध्ये करण्याचे आदेश देण्यात आले असून १६ मे पासून जनगणना सुरू होईल.

# अनुराधा पतसंस्थेच्या अध्यक्षाचा ऱ्हदय विकाराने मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

हिंगोली येथील अनुराधा पतसंस्थेच्या ६.२७ कोटी रूपयांच्या अपहार प्रकरणात मागील २० महिन्यापासून परभणीच्या तुरूंगात न्यायालयीन कोठडीत असलेल्या पतसंस्थेच्या अध्यक्षाचा ऱ्हदय विकाराने मृत्यू झाल्याची घटना दि ३ मे रविवारी घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली येथील अनुराधा पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक कांबळे रा गोपाल टॉकीजजवळ वाशिम याने पतसंस्था स्थापन करून ठेवीदारांना जादा व्याजदराने परताव्याचे आमिष दाखविले होते. यामध्ये इतर संसथेपेक्षा अधिक म्हणजेच १० ते १२ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून ४०३८ ठेवीदारांकडून ६ कोटी २७ लाख रूपयांच्या ठेवी गोळा केल्या होत्या. मात्र ठेवीदारांनी ठेवी दिल्यानंतर त्याची मुदत संपल्यानंतरही ठेवीची रक्कम परत केली नाही. त्यानंतर पतसंस्थेच्या लेखा परिक्षणामध्ये अध्यक्ष अशोक कांबळे व संचालकांनी बनावट ठराव व बनावट कर्ज प्रकरण मंजूर करून सदर रकमेचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले होते. दि २४ डिसेंबर २०१९ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अपहार केल्याचे दिसून आले. या प्रकारामुळे ठेवीदारांमधून एकच खळबळ उडाली होती. ठेवीची रक्कम परत मिळणार की नाही असा मोठा प्रश्न ठैवीदारांसमोर उभा राहीला होता.

त्यानंतर या प्रकरणात लेखा परिक्षक अनिल बंधू यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक कांबळे यांच्यासह १२ जणांवर ६.२७ कोटी रूपयांच्या फसवणूक प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलिस अधीक्षक जी श्रीधर यांनी प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविला होता. या प्रकरणात अशोक कांबळे यास पोलिसांनी अटक केली होती. दि ९ ऑगस्ट २०२४ पासून तो परभणीच्या तुरूंगात न्यायालयीन कोठडीत होता. दि ३ मे रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्याला अस्वस्थ वाटत असल्याने तुरूंगातील कर्मचाऱ्यांनी कांबळेला तातडीने शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी करून त्याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले.



**हिंगोली- सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शहरातील अंतुले नगर चौक ते रिसाला बाजार रेल्वे पूलापर्यंत रस्त्याचे काम सुरू असून पेवर ब्लॉक बसविण्यात येत आहे. आताच या कामाची दुरावस्था छायाचित्रात दिसत आहे. या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे दिसत आहे. छाया- सुनील पाठक**

# दागिने घरात न ठेवता लॉकरमध्ये सुरक्षित ठेवा- पोलिस निरीक्षक मोहन भोसले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**



सध्या लग्नसराईचा मोसम सुरू असून अनेक जणांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव बँक लॉकर मध्ये ठेवलेले दाग दागिने काढून आणतात व लग्न सोहळा संपल्यानंतर सुद्धा लगेच लॉकरमध्ये न ठेवता घरातील कपाटात सुरक्षित म्हणून ठेवतात परंतु हीच चूक नडते व घरात जेव्हा चोरी होते तेव्हा चोरट्याचे पहिले टार्गेट हे कपाट असते व सर्व दागिने लंपास होतात त्यामुळे आपण लॉकर मधून काढून आणलेले दागिने किंवा घरातील इतर दागिने कपाटात न ठेवता इतरत्र ठेवावे व काम झाल्यानंतर तात्काळ परत लॉकरमध्ये जमा करावे.

तसेच उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये बाहेरगावी किंवा फिरायला जाताना तसेच मूळ गावी जाताना शेजाऱ्यांना घर बंद असल्याची कल्पना द्यावी तसेच शक्यतो आतल्या बाजूने कुलूप लावावे, घरातील लाईट चालू ठेवावे, चोरट्यांना रस्त्यावरून जाताना घर बंद आहे किंवा घराला समोरून कुलूप लावले आहे अशा प्रकारचे निर्दर्शनास येऊ नये.

तसेच गल्लीत शक्यतो अनेक जणांनी मिळून सीसीटीव्ही लावावी स्थानिक वाचमन वगैरे सुद्धा शक्य असल्यास ठेवावे. सराफा लाईन, बँक अधिकारी यांनी सुद्धा वाचमन यांना सतर्क करावे योग्य त्या सूचना द्याव्या व कोणत्या क्षणी हिंगोली पोलीस टोल फ्री क्रमांक ११२ वर संपर्क करावा.

उन्हाळ्यामध्ये चोरीचे प्रमाण हे नेहमी वाढत असते लोक घरात न झोपता बाहेर उघड्यावर झोपत असतात त्यामुळे चोरट्यांनी उघड्यावर झोपलेल्या महिलांचे दाग दागिने चोरून नेणे तसेच घरात कोणीही नसल्यामुळे घरातील कपाट घरात प्रवेश करून चोरी करणे असे प्रकार घडत असतात त्यामुळे सर्व नागरिकांनी चोरी न होण्यासाठी व झालीच तरी मौल्यवान वस्तू न मिळण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी. हिंगोली पोलीस २४ तास आपल्या मदतीसाठी सतर्क आहे. उन्हाळ्यामध्ये होणारे मालाविरुद्धचे गुन्हे रोखण्यासाठी हिंगोली पोलीस दलातर्फे दैनंदिन नाकाबंदी, पोलीस स्टेशन स्तरावरील पेट्रोलिंग तसेच स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पेट्रोलिंग ठेवण्यात आली आहे, तरीसुद्धा नागरिकांनी खबरदारी घेऊन मौल्यवान वस्तू कपाटात ठेवू नये तसेच कपाटामध्ये सोन्यासारखे दिसणारे वस्तू ठेवल्यास चोरटे इतरत्र शोध घेणार नाहीत .

# शाम मानव यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृहात अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष शाम मानव यांचे बुवा तेथे बाया या विषयावर व्याख्यान दि ६ मे रोजी झाले. यावेळी भोंद्र बाबा महिलांचा व भक्तांचा वापर कसा करतात, श्रध्देच्या आडून व महिलांना पुढे करून भोंद्र बाबा आपला स्वार्थ कसा साधतात, महिलांची शारीरिक व आर्थिक फसवणूक कशी करतात समाजाची फसवणूक, अशा ढोंगी बाबांना कसे ओळखायचे तसेच जादुटोणाविरोधी कायद्यांसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले यावेळी मोठ्या संख्येने श्रोते मंडळी उपस्थित होती.

# क्रांतीकारी शेतकरी संघटनेने कृउबा समितीमध्ये लिलाव बंद केला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अवकाळी पावसामुळे हळद भिजल्याने संतप्त झालेल्या क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हळदीचे लिलाव बंद पाडले.

दि ५ मे रोजी अचानक झालेल्या पावसामुळे बाजार समिती परिसरातील शेतकऱ्यांची हळद पूर्णपणे भिजून मोठे नुकसान झाले. यामुळे दि ६ मे रोजी संतप्त झालेल्या क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जोरदार आंदोलन केले. शेतकऱ्यांची हळद काळी झाली या निषेधार्थ संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बाजार समितीच्या मुख्य प्रवेश द्वाराला काळे लावले. त्यानंतर अनेक शेतकरी मार्केट यार्डमध्ये दाखल झाले. यावेळी हळदीचे दर घसरल्याचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला. शेतकऱ्याच्या हळदीला योग्य दर मिळत नसल्याने आणि हळद खरेदी प्रक्रीयेमध्ये होत असलेल्या विलंबामुळे क्रंतीकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काही काळासाठी बाजार समितीतील लिलाव बंद पाडला.

यानंतर पोलिस आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव नारायण पाटील यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. बाजार समिती प्रशासनाच्या वतीने शेतकऱ्यांची हळद योग्य दरात खरेदी करण्यात येईल, खरेदीसाठी जास्त वेळ लागणार नाही तसेच भविष्यात कोणत्याही शेतकऱ्याची हळद भिजणार नाही याचे नियोजन करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात क्रांतीकारी शेतकरी सघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, तालुकाध्यक्ष चैतन्य चव्हाण, प्रवीण मते, सखाराम भाकरे, राम चव्हाण, संतोष सावके, संदीप पाटील, मनोहर पाटील, अशोक जयस्वाल यांच्यासह शेतकरी सहभागी झाले होते.९

## संक्षिप्त वृत्त

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गोजेगावात सत्कार



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील गोजेगाव जिल्हा परिषद शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. श्रेया इंटेलिजंट आकादमी या परीक्षेमध्ये गोजेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. श्रेया परीक्षातील गुणवंत विद्यार्थी प्रजल विक्रम खिल्लारे राज्यात २७ व गोल्ड मेडल तर धनश्री रमेश सांगळे राज्यात ८८ वी गोल्ड मेडल, शामल मल्हारी जायभाय गोल्ड मेडल ,शिवराज मच्छिंद्र जायभाये, राधिका प्रदीप सांगळे, आराध्या गुलाब खिलारे, पुनम किसन सांगळे, यासह वरील सात विद्यार्थी गोल्ड मेडल ठरल्यामुळे त्यांचा गावातील शिंदे सेनेचे औंढा नागनाथ तालुकाप्रमख तथा माजी सभापती राजेंद्र सांगळे यांच्या उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वर्षा अच्युतराव नागरे (सरपंच) नामदेव खिल्लारे (उपसरपंच) शालेय समितीचे अध्यक्ष साहेबराव बांगर, मुख्याध्यापक माहेश्वरी दहिफळे आदींची उपस्थिती होती.

# शिंदेफळ येथे आगीत दोन घरे भस्मसात, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे यांची घटनास्थळी भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**



सेनगाव तालुक्यातील शिंदेफळ येथे दोन घरांना आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य, शेतीमाल तसेच हळद विक्री करून आलेले रोख रक्कम जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये लाखो रूपयांचे नुकसान झाले असून शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळी भाजपचे युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी भेट दिली असून पिडीत कुटुंबांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

सेनगाव तालुक्यातील शिंदेफळ येथील विनोद लोणकर हे कुटुंबियासह शेतात कामाला गेले होते. दुपारच्या सुमारास त्यांच्या घरातून धूर निघू लागला. याचवेळी सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे आगीने रौद्र रूप धारण केले. विनोद यांच्या घराला आग लागल्याचे लक्षात येताच गावकऱ्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली. मात्र काही वेळातच आगीची झळ शेजारी असलेल्या विनोद तुरूकमाने यांच्या घराला बसली. दोन्ही घरे आगीच्या भक्षस्थानी सापडले.

नागरिकांनी मिळेल ते साहित्याने आगीवर पाणी ओतण्यास सुरूवात केली. त्यानंतर सेनगाव नगर पंचायतीनचे अग्नीशमन दल दाखल झाले. तसेच सेनगावचे सपोनि दिपक मस्के, जमादार चव्हाण, नवखे यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. दोन तासानंतर आग आटोक्यात आली. या आगीत विनोद लोणकर यांचे हळद विक्री करून आलेले १ लाख रूपये व इतर साहित्य जळाले तर विनोद तुरूकमाने यांचे हळद विक्री करून आलेले दीड लाख रूपये व इतर साहित्य, दागिने जळून खाक झाले आहेत. घराचेही मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेची माहीती मिळताच भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी शिंदेफळ येथे भेट देत घटनास्थळाची पाहणी करीत नुकसानग्रस्त कुटुंबांचे सात्वन करीत त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# निकृष्ट दर्जाचे पेवर ब्लॉक बसविणाऱ्यांची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मे**

शहरातील अंतुले नगर चौक ते रिसला बाजार रेल्वे पूलापर्यंत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामध्ये निकृष्ट दर्जाचे पेवर ब्लॉक बसविण्यात येत असून या कामाची तत्काळ चौकशी करावी अशी मागणी भाजपचे शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत आणि नगरसेवक कैलाश शहाणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील अंतुले नगर ते रिसाला बाजार रेल्वे पूलापर्यंत रस्त्याचे काम सुरू आहे. रस्त्याच्या कडेला पेवर ब्लॉकचे कामही सुरू आहे परंतु ते बसवितांना आवश्यक असलेला बेड, सब बेस, सँड बेड, कॉम्पॅक्शन, लेव्हलिंग, जॉईट फिलिंग व फिनिशिंग योग्य पक्रारे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडांचे नियोजन आहे का, निकृष्ट साहीत्य वापरून किंवा अयोग्य पध्दतीने काम केल्यास भविष्यात हे पेवर ब्लॉक पाच ते सहा महिन्यापर्यंतच टिकणार असल्याची दिसत आहेत. याचा त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागणार आहे तसेच शासनाचे लाखो रूपये पाण्यात जाणार आहेत. त्यामुळे या कामाची तत्काळ चौकशी करावी तसेच संबंधित कंत्राटदारास दर्जा सुधारण्याबाबत आणि निविदेतील अटी व शर्ती नुसार काम करण्यासाठी बंधनकारक करावे अन्यथा भाजपच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# नांदेडात साडेचार हजार शस्त्रे जप्त; ग्रामीण पोलीसांची कारवाई



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ मे -**

नांदेड ग्रामीण पोलीस धडक कारवाई करत तब्बल ४३ लाख ४८ हजार रुपयांचा मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. राज्यातील आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई मानली जात असून याप्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून अवैध शस्त्र विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांना अवैध शस्त्रसाठ्याबाबत गुप्त माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे त्यांनी आपल्या पथकासह मंगळवारी सकाळी शहरातील वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुरुद्वारा परिसरात छापा टाकला. छापेमारीदरम्यान मोठ्या प्रमाणात धारदार शस्त्रांचा साठा आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ हजार ७९६ शस्त्रे जप्त केली असून त्यामध्ये तलवारी, कुपऱ्या, खंजर तसेच विविध प्रकारची धारदार हत्यारे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जप्त केलेल्या शस्त्रांची अंदाजे बाजार किंमत ४३ लाख ४८ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी जसवंत सिंघ प्रकाश सिंघ सुखमणी (वय ५० वर्षे, रा. रामदास नगर, अपचल नगर परिसर, नांदेड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे शस्त्रसाठा कसा आला, तो कुठे विक्रीसाठी आणला होता तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. जप्त करण्यात आलेला संपूर्ण शस्त्रसाठा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या आवारात सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात हा शस्त्रसाठा कोलंबिया, चीन, अमेरिका तसेच इतर परदेशांतून आणण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. राज्यातील अवैध शस्त्र व्यवहारावर मोठा आळा बसण्यास या कारवाईमुळे मदत होणार असल्याचे पोलिसांचे मत आहे. दरम्यान, या मोठ्या कारवाईमुळे नांदेड

जिल्ह्यात अवैध शस्त्र व्यवहारांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर करीत आहेत.

# आठवडी बाजारात थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ७ मे -**

भर उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी तसेच आठवडी बाजारात येणाऱ्या विक्रेत्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन बिलोली नगर परिषदेच्या वतीने आठवडी बाजार परिसरात थंड पिण्याच्या पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या जनहिताच्या उपक्रमाचे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात स्वागत होत असून उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे.

यावेळी उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर म्हणाले की, नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी हे नेहमीच नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन काम करतात. नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. भर उन्हाळ्यात आठवडी बाजारात येणाऱ्या व्यापारी व नागरिकांना दिलासा मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असून तो निश्चितच कौतुकास्पद आहे.




बिलोली शहरात दर गुरुवार व रविवार रोजी मोठ्या प्रमाणात आठवडी बाजार भरतो. या बाजारात भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेते, व्यापारी तसेच ग्रामीण भागातून खरेदीसाठी येणारे महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. वाढत्या उष्णतेमुळे बाजार परिसरात नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होत असल्याचे लक्षात येताच नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी तात्काळ पुढाकार घेत थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

गुरुवारी झालेल्या या उपक्रमावेळी उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर, नगरसेवक प्र. महेंद्र गायकवाड, नगरसेवक अब्दुल फिरदोस, शिवाजी गायकवाड, डॉ. मनोज शंखपाळे तसेच सादिक पटेल उपस्थित होते. यावेळी बाजारात येणाऱ्या व्यापारी, विक्रेते व नागरिकांना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले. या सुविधेमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

या उपक्रमामुळे बाजारातील व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी नगर परिषदेचे आभार मानले. उन्हाळ्यात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक व कर्मचारी सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## उष्मालाटेच्या पार्श्वभूमीवर खाजगी क्लासेससाठी आदेश निर्गमित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ मे -**

जिल्ह्यात वाढत्या तापमानाची तीव्रता लक्षात घेवून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० अन्वये नांदेड जिल्हा सीमा क्षेत्रातील सर्व खाजगी क्लासेसबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

नांदेड जिल्ह्यातील सर्व खाजगी क्लासेसनी सकाळी-सायंकाळच्या सत्रात किंवा ऑनलाईन-डिजीटल माध्यमातून क्लासेस घेण्यात यावेत. दुपारी १२ ते ४ या वेळेत कुठल्याही खाजगी क्लासेस संस्थानी व्यक्तीश: विद्यार्थ्यांना बोलावून क्लासेस घेवू नयेत. याबाबत वेळोवेळी हवामान खात्यामार्फत निर्गमित केल्या जाणाऱ्या हवामान इशाऱ्याची देखील नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना उष्मालाटेपासून संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

# शॉर्ट बॉण्ड्री क्रिकेट स्पर्धेचा शानदार शुभारंभ



**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ७ मे -**

स्व. राजेश देशमुख तळेगावकर नगराध्यक्ष उमरी यांच्या स्मरणार्थ डॉ. विक्रम देशमुख मित्रमंडळ तळेगाव यांच्या वतीने आयोजित भव्य शॉर्ट बॉण्ड्री टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा तळेगाव येथील बापुसाहेब देशमुख महाविद्यालय येथे उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील युवकांनी क्रीडा क्षेत्रात पुढे यावे आणि त्यांच्या अंगी असलेली खेळाची गुणवत्ता विकसित व्हावी, या उदात्त हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन युवा नेते व तझघ उद्योग समूहाचे चे उएज संदीप पाटील कवळे तसेच उमरी पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गांधी निराधार समितीचे तालुका अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख हे होते.

या स्पर्धेत एकूण १६ संघांचा सहभाग असून, तळेगावसह परिसरातील क्रिकेटप्रेमी आणि युवकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती दर्शवली. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये सतीश देशमुख चेअरमन से. सह. सो. तळेगाव , विश्वजीत देशमुख प्राचार्य विद्याभारती ज्यु. कॉलेज उमरी , बालाजी पाटील शिंदे, बोळसेकर, रावसाहेब पा.वडजे , संदीप पाटील मोरे चिंचाळेकर, रामू रेड्डी, गणेश पाटील जाधव, अनु मिस्त्री, ताजोद्दीन मिस्त्री, मुज्जमील बेग, बि. बी. खदगाये, संभाजी पाटील जाधव, गंगाधर जाधव, अलीम पटेल, तखीउल्ला पटेल व्हा. चेअरमन , प्रवीण खडेलोटे, प्रल्हाद पाटील जाधव, आयुबखान पठाण मा. उपसरपंच ,मुजमिल बेग मोगल,नदीम बेग, माजी सरपंच बालाजी नागालवाड, मा. सरपंच गंगाधर शिगळे, रमेश उडतेवार, नवाज बेग, मारोती आरटवार, खलील सय्यद,आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेसाठी पारितोषिक करण्यात आली असून प्रथम पारितोषिक छ६१,ˋ/-डॉ. विक्रम देशमुख , द्वितीय छ४१ˋ,/- शेख ताजोद्दीन मिस्त्री , तृतीय छ २१ˋ,/- अनु मिस्त्री आणि चतुर्थ छ ११, ˋ/- रामू रेड्डी कप्पावार यांच्या तर्फे बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. याशिवाय उत्कृष्ट खेळाडूंना वैयक्तिक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याचे आवाहन केले. तसेच अशा स्पर्धांमुळे युवकांना व्यसनांपासून दूर ठेवून सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

या स्पर्धेचा अंतिम सामना दि. १० मे रोजी डॉ. विक्रम देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त पार पडणार असून, त्याच दिवशी सर्व विजेत्या संघांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विक्रम देशमुख मित्रमंडळ चे संयोजक अध्यक्ष जमील बेग सजाद बेग, उपाध्यक्ष संभाजी पा. जाधव, शेख समीर, हुमेर बेग, शाहरुख शेख, इरफान बेग, अनिकेत खंडेलोटे,तळेगाव येथील गावकरी मंडळी यांनी विशेष परिश्रम घेतले असून, संपूर्ण परिसरात सध्या क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे. आगामी सामन्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ना. सुनेत्रा पवारांचा विजय ही अजित दादांना खरी श्रद्धांजली

**नांदेड** -आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत दिवंगत नेते राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे मोठे योगदान राहिले आहे. दादांच्या अकाली जाण्याने बारामतीकरांसह उभा महाराष्ट्र हळहळला होता. दादांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचा आज ऐतिहासिक विक्रमी मतांनी विजय झाला आहे. हा विजय मतदारांनी दादांना दिलेली खरी श्रद्धांजली होय असे मत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी अजित पवार ह्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणुकीच्या रिंगणात होत्या. आज झालेल्या मतमोजणीत दोन लाखाहून अधिक मतदान मिळवून देशातील सर्वाधिक मताधिक्य मिळवून विजयी होणाऱ्या त्या एकमेव आमदार ठरल्या आहेत. बारामतीच्या मतदारांनी अजित दादांवर आणि सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वावर दाखविलेला हा विश्वास आहे. आगामी काळात महाराष्ट्राच्या संपूर्ण विकासासाठी ना. सुमित्रा वहिनी पवार प्रचंड ऊर्जेने काम करण्यासाठी मतदारांनी दिलेली ही प्रेरणा आहे. त्यामुळे अजितदादांनी महाराष्ट्राच्या विकासाची पाहिलेली स्वप्न आगामी काळात निश्चित पणे सुनेत्रा पवार पूर्ण करतील असा विश्वासही आ. चिखलीकर यांनी व्यक्त केला.

## नगरसेविका नाजेमा बेगम बंदेअली खान पठाण हज यात्रेसाठी रवाना

**मुदखेड** -मुदखेड नगर परिषदेच्या नगरसेविका तसेच गटनेत्या नाजेमा बेगम बंदेअली खान पठाण या पवित्र हज यात्रेसाठी रवाना झाल्या असून, त्यांच्या या आध्यात्मिक प्रवासामुळे परिसरात आनंदाचे



वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. हज ही इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र व अनिवार्य धार्मिक यात्रा मानली जाते. प्रत्येक मुस्लिमासाठी ही यात्रा आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाची आणि भाग्याची संधी असते. नाजेमा बेगम पठाण या दिवंगत बंदेअली खान पठाण यांच्या पत्नी असून युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण यांच्या त्या वहिनी आहेत. त्यांनी आपल्या कार्यकाळात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून नगर विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत व नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या हज यात्रेच्या निमित्ताने अनेक नागरिकांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला. त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी तसेच यात्रा सुखरूप आणि यशस्वी होण्यासाठी सर्वांनी प्रार्थना व्यक्त केल्या. त्यांच्या परतीनंतर त्या नव्या उर्जेसह पुन्हा समाजकार्यात सक्रिय होतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## गोभक्तांची नामसंकीर्तन शोभायात्रा

**धर्माबाद** -गो सन्मान आव्हान अभियान अंतर्गत देशपातळीवर सर्व ठिकाणी २७ एप्रिल रोजी एकाच दिवशी सर्व तहसील येथे गोमाता राष्ट्रमाता घोषित होणे व गोमातेचे संवर्धन होणे अशा गोमातेच्या विविध मागण्यासाठी साधू संतांच्या उपस्थितीत गो आंदोलन करण्यात आले. आद्य जगतजननी गोमाता व प्रधान नंदी महाराज हेच या आंदोलनाचे प्रमुख होते .अनेक साधुसंतांच्या व गो भक्तांच्या उपस्थितीत गोमातेसाठी सर्व तालुक्यात निवेदन देण्यात आले आहे. दिनांक २७ एप्रिल २०२६, सोमवार रोजी धर्माबाद येथे श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळा यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय पंतप्रधान, माननीय राष्ट्रपती, माननीय मुख्यमंत्री, माननीय राज्यपाल व माननीय तहसीलदार, यांना तहसीलदार यांच्यामार्फत गोमातेच्या विविध मागणी संदर्भात निवेदन देण्यात आले आहे .या कार्यासाठी श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळेतील गोसेवक यांनी धर्माबाद तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन हस्ताक्षर कार्ड वितरित केले होते . गोमातेस राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी प्रत्येक गावातून हस्ताक्षर मोहीम राबविली गेली , त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# नसरापूर घटनेतील दोषीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ७ मे -**

मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा सुनवावी, अशी ठाम मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसील प्रशासनाचे नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांना काँग्रेसशिष्ट मंडळाकडून निवेदन देण्यात आले.

यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना मुदखेड तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद



केल्याप्रमाणे, या घटनेमुळे महिलांच्या व लहान मुलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा अमानुष कृत्यांवर कठोर कारवाई न झाल्यास भविष्यात अशा घटना वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्ट) चालवून दोषींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार,सूर्यकांत चौदंते, माजी उपसभापती राजेश पवार,माजी उपनगराध्यक्ष करीम खान ,माजी नगरसेवक गंगाधर पाटील डांगे, नगरसेवक प्रतिनिधी मुजीब पठाण,नगरसेवक अविनाश चौदंते,खदीर खूरेशी,विश्वनाथ पाटील पवार,रमेश बोडके,अतिक अहमद,विठ्ठल आचार्य, मोहम्मद अनीस,गंगाधर पाटील मगरे,यासह आदींची उपस्थिती होती.

# नगर परिषद हदगाव येथे प्रगणक व पर्यवेक्षक यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ मे -**

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत जनगणनेच्या पहिल्या टप्प्या करिता नगर परिषद , हदगावच्या सभागृहात दि.०४ ते ०६ मे या कालवधीत प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याकरिता तीन दिवसीय प्रशिक्षण पार पडले.

या प्रशिक्षणास ४३ प्रगणक व ८ पर्यवेक्षक हजर होते .

या प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी गौरव वांडेकर चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव हे होते .



प्रशिक्षणाचे नियोजन सिद्धार्थ गायकवाड यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोनाली रावते यांनी परिश्रम घेतले. गोविंद नागरगोजे फिल्ड ट्रेनर व प्रतीक विश्वासराव यांनी प्रगणक पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण दिले.

प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी जनगणने बाबत सविस्तर माहिती देण्यात आली तसेच दुसऱ्या दिवशी HLO pp च्या वापराबद्दल माहिती देण्यात आली तर प्रशिक्षणाच्या तिसऱ्या व अंतिम दिवशी HLO pp चे शहरात फिरून प्रात्यक्षिक देण्यात आले .

दि.०१ मे ते १५ मे पर्यंत नागरिकांना स्वगणना करण्याकरिता हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात स्व: गणना करावी अशे आवाहन गौरव वांडेकर चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव यांनी केले आहे.

# इस्लापूर ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे तलाव गाळाने गुदमरले

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ७ मे -**

इस्लापूर गावालगत असलेले तलाव आज अक्षरशः गाळाच्या विळख्यात अडकले असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे तलावांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची संतप्त भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. वर्षानुवर्षे तलावातील गाळ काढण्याची मागणी होत असतानाही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची धूळफेक केली जात असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावातील नागरिक, गणेश मंडळे, सामाजिक कार्यकर्ते तसेच परिसरातील शेतकरी यांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तलाव स्वच्छतेची मागणी केली. बैठका झाल्या, चर्चा झाल्या, आश्वासने



देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात तलावातील गाळ काढण्यासाठी कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याची प्रतिक्रिया गावकऱ्यांतून उमटत आहे.

विशेष म्हणजे, दरवर्षी गणपती विसर्जन आणि दुर्गादेवी विसर्जन याच तलावामध्ये मोठ्या भक्तिभावाने केले जाते. गणेश विसर्जनापूर्वी होणाऱ्या ग्रामपंचायत आणि गणेश मंडळांच्या बैठकीत तलाव स्वच्छता, गाळ काढणे आणि विसर्जन व्यवस्थेबाबत मोठमोठ्या चर्चा केल्या जातात. मात्र बैठका संपल्यानंतर प्रत्यक्षात कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ग्रामपंचायतीला तलावांची आठवण फक्त उत्सवाच्या काळातच होते का? असा सवाल गावकरी उपस्थित करत आहेत.

मागील अनेक वर्षांपासून पावसाच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणावर गाळ तलावामध्ये साचत गेला. परिणामी तलावांची खोली कमी झाली असून तलाव उथळ बनले आहेत. पावसाळ्यात तलाव भरल्याचे चित्र दिसते; मात्र गाळ वाढल्याने पाणीसाठा टिकून राहत नसल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

विशेष म्हणजे, हे तलाव परिसरातील वन्यप्राणी, गाई-म्हशी तसेच विविध पशुपक्ष्यांसाठी पाण्याचा महत्त्वाचा स्रोत मानले जातात. उन्हाळ्याच्या दिवसांत अनेक जनावरे आणि पक्षी या तलावावर अवलंबून असतात. मात्र तलाव गाळाने भरल्याने नैसर्गिक पाणीसाठ्यावर परिणाम होत असून पर्यावरणीय समतोल धोक्यात येण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

गावातील काही ज्येष्ठ नागरिकांच्या मते, पूर्वी तलाव परिसर स्वच्छ आणि मोकळा होता. मात्र अनेक वर्षांपासून गाळ न काढल्याने तलावाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. नागरिकांच्या मते, वेळेत गाळ काढण्यात आला असता तर तलावाचे स्वरूप अधिक चांगले राहिले असते.

यामध्ये संबंधित शेतकरी आंबटवाड यांच्याशी चर्चा करून ग्रामपंचायतीने पुढाकार घेतल्यास तलावातील गाळ काढण्याचे काम मार्गी लागू शकते, असेही ग्रामस्थांचे मत आहे. मात्र प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे हा विषय केवळ चर्चे पुरताच मर्यादित राहिल्याची चर्चा गावात सुरू आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी असा आरोप केला आहे की, गावात विविध विकासकामांच्या घोषणा केल्या जातात; पण प्रत्यक्ष गरजेच्या विषयांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. तलाव स्वच्छतेसारख्या महत्त्वाच्या विषयावर ग्रामपंचायतीने गांभीर्याने काम न केल्याने प्रशासनाविरोधात रोष वाढत आहे.

गणेश मंडळातील कार्यकर्त्यांनीही नाराजी व्यक्त करत सांगितले की, विसर्जनाच्या वेळी तलाव परिसरात चिखल, दुर्गंधी आणि अस्वच्छता निर्माण होते. गाळ वाढल्याने विसर्जनासाठीही अडचणी निर्माण होत आहेत. तरीदेखील प्रशासनाकडून कायम दुर्लक्षच केले जात असल्याचा आरोप करण्यात आला.

आता तरी संबंधित विभाग, ग्रामपंचायत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी जागे होऊन तातडीने तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

# बीड भूसंपादन मावेजा घोटाळा : माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक ताब्यात

## 154 बनावट मोबदला आदेशांचा तपास वेगात, बनावट सह्या वापरुन 241 कोटी 62 लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर




**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | जिल्ह्यातील बहुचर्चित भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी लातूर येथून ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना लातूर न्यायालयात हजर केल्यानंतर पुढील चौकशीसाठी बीडकडे आणले जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्यांना ताब्यात घेऊन रवाना होणार असल्याची माहिती मिळताच महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

बीड जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनावेळी शेतकऱ्यांचा मावेजा आणि जमिनीच्या संपादनात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या राष्ट्रीय महामार्ग संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा वाढवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या वापरून बनावट आदेश तयार करण्यात आला. यामुळे सरकारचे 73 कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणात यापूर्वीच 10 जणांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नावाचा ही समावेश होता.

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमानुसार संपादित जमिनींना वाढीव मोबदला मिळवण्यासाठी खातेदार जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करतात. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक 22 एप्रिल 2025 रोजी बदली होऊन गेल्यानंतरही, त्यांच्या कार्यकाळातील मागच्या तारखा बनावट आदेश काढण्यात आले. या बनावट आदेशांद्वारे 154 प्रकरणांमध्ये जुन्या तारखा आणि बनावट सह्या वापरून 241 कोटी 62 लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. यापैकी अंदाजे 73 कोटी 4 लाख रुपये संबंधित खातेदारांना वाटपही करण्यात आले. विशेष म्हणजे संबंधित आदेश देताना करताना कोणतेही रजिस्टर, नोंदवहीबाबत माहिती भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवलेली नाही.

बीड जिल्ह्यातील कथित भूसंपादन मोबदला घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे नाव, पदनाम आणि स्वाक्षरीचा वापर करून तब्बल १५४ भूसंपादन प्रकरणांमध्ये बनावट मोबदला आदेश तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी भूसंपादन उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात १० आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास सुरुवातीला पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे होता. मात्र त्या रजेवर गेल्यानंतर तपासाची जबाबदारी एम. व्यंकटराम यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तपासादरम्यान आता तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनाही ताब्यात घेण्यात आल्याने या घोटाळ्याचा तपास अधिक वेगाने होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**महसूल विभागात धास्ती**

जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याला घोटाळ्याप्रकरणी ताब्यात घेतल्याची बीड जिल्ह्यातील ही पहिलीच मोठी घटना असावी. या कारवाईमुळे महसूल विभागातील भ्रष्ट साखळीचे धाबे दणाणले आहेत. अविनाश पाठक यांच्या चौकशीतून आणखी कोणती मोठी नावे समोर येतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव समोर आल्याने जिल्हाभरात चर्चेला उधाण आले असून आगामी काळात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र. नं. 544/2025 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) 2023 कलम 318(4), 316(5), 338, 336(3), 340(2), 198, 199, 316(2), 61, 351(4) तसेच महाराष्ट्र भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7, 13 आणि मध्यस्थी आणि सलोखा कायदा 1996 कलम 14, 34 अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथकामार्फत सुरू आहे. सदर प्रकरणात एकूण 310 कोटींचा अपहार झाला असून आतापर्यंत 73 कोटी रुपये रक्कम वाटप झाले आहेत. सदर गुन्ह्यामध्ये एकूण 10 आरोपींचा समावेश असून त्यापैकी 3 आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून उर्वरित तपास सुरू आहे.

तपासादरम्यान फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब नोंदविण्यात आले असून सीसीटीव्ही फुटेज, व्हिडिओ, ऑडिओ, नोंदवही, रजिस्टर इत्यादी महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात आले आहेत. तसेच अटक आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाईल मधील कॉल तपशील व मोबाईल रेकॉर्डिंगच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले आहे. याच अनुषंगाने हस्तलिखित व स्वाक्षरी नमुन्यांचे तज्ज्ञांकडून परीक्षण करण्यात आलेले आहे. तपासादरम्यान मिळालेल्या तांत्रिक व दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे आज बीड येथील तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक यांना पुढील चौकशीसाठी बीड पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

सदर कारवाई मा. पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र श्री. शहाजी उमाप तसेच प्र. पोलीस अधीक्षक, बीड श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक, केज श्री. वेंकटराम यांचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा बीड तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड कार्यालयाचे पथक यांनी संयुक्तरीत्या सहभाग घेतला आहे.

### 10 जणांवर गुन्हा, 7 अद्याप फरार

या गुन्ह्यात सहाय्यक महसूल अधिकारी संजय हांगे, अविनाश चव्हाण, शेख अजहर शेख बाबू, त्रिंबक पिंगळे, पांडुरंग पाटील, श्री. राऊत तसेच अॅड. एस. एम. नन्नवरे, अॅड. नरवडकर, अॅड. पिसूरे आणि अॅड. प्रवीण राख यांचा समावेश आहे. यापैकी संजय हांगे, त्रिंबक पिंगळे आणि शेख अजहर शेख बाबू या तिघांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. उर्वरित सात आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

# भाच्याने केला मामाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**तभा. वृत्तसेवा**

**केज** | बीडच्या केज तालुक्यातील युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला आणि पवित्र नात्यांना काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी मामाच्या गावाला आलेल्या भाच्याने अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे.

बीडच्या केज तालुक्यात हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका २९ वर्षीय नराधम भाच्याने आपल्या अवघ्या १० वर्षांच्या लहान बहिणीवर (मामाच्या मुलीवर) अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विशेष म्हणजे, या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या तीन दिवसांतील ही अत्याचाराची तिसरी घटना असल्याने संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण उन्हाळ्याच्या सुट्ट्या घालवण्यासाठी आपल्या मामाच्या गावी आला होता. ज्या घरात आश्रय घेतला, ज्या मामाने प्रेम दिले, त्याच घराचा विश्वास या नराधमाने घात केला. घटनेच्या रात्री पीडितेचे आई-वडील शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. घरात दहा वर्षांची चिमुकली एकटीच असल्याचे पाहून आरोपीची वाईट नजर गेली. घरात कोणी नसल्याचा फायदा घेत त्याने या चिमुकलीवर अत्याचार केला.

# भावाच्या लग्नाची खरेदीसाठी आलेली बहीण अपघातात ठार

बीड : दोन दिवसांवर भावाचे लग्न आल्याने खरेदीसाठी बीडमध्ये आलेल्या महिलेचा अपघातात मृत्यू झाला. ही घटना शहरातील साठे चौकात बुधवारी दुपारी एक वाजता घडली. ही महिला ज्या दुचाकीवरून जात होती, त्या दुचाकीला एका कंटेनरने धडक दिली. या प्रकरणी पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले आहे.

प्रतीक्षा रामेश्वर चौधरी (वय 45 रा. शिराळा ता. बार्शी ह.मु.क. पिंपळगाव ता. वाशी जि. धाराशिव) असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. प्रतीक्षा चौधरी यांच्या भावाचे दोन दिवसांनी लग्न असल्याने त्या बीडमध्ये भाऊ व भावजयीसोबत बुधवारी दुपारी आल्या होत्या. प्रतिक्षा चौधरी यांचा भाऊ प्रदिप गव्हाणे हा दुचाकी चालवत होता तर त्यांच्यासोबत निशा गव्हाणे या देखील होत्या. त्यांची दुचाकी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास साठेचौकातून जात असताना कंटेनरने धडक दिल्याने त्या खाली पडल्या, त्यांच्या डोक्यावरुन कंटेनरचे चाक गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.

# केज उपजिल्हा रुग्णालय शस्त्रक्रियात जिल्ह्यात अव्वल; रुग्णसेवेचा उच्चांक

**तभा. वृत्तसेवा**

**केज (प्रतिनिधी)** | केज येथील उपजिल्हा रुग्णालयाने आरोग्य सेवेमध्ये एक मोठी झेप घेतली आहे. दर्जेदार उपचार आणि यशस्वी शस्त्रक्रियांच्या जोरावर या रुग्णालयाने संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वसामान्यांसाठी हे रुग्णालय आता एक मोठा आधारवड ठरत आहे.



उपजिल्हा रुग्णालयाने मागील वर्षभरात २११७ शस्त्रक्रिया करून प्रथम क्रमांकावर उच्चांक गाठला आहे.

वैद्यकीय अधीक्षक जनरल सर्जन डॉ दत्तात्रेय केंद्रे . स्त्री रोग तज्ञ डॉ केशव इंगोले, शस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉ चाळक भाऊसाहेब,डॉ स्वाती साखरे , भूलतज्ञ डॉ दिगंबर मुंडे , श्रीमती डॉ पाटील , बालरोग तज्ञ डॉ सावंत बालासाहेब , डॉ निवृत्ती मुंडे, ऑर्थो तज्ञ डॉ अमोल गीते, डॉ श्रीकृष्ण म्हात्रे, नेत्रचिकित्सा विभाग डॉ सुमित कुलकर्णी,डॉ पाटील,डॉ घुगे,डॉ हजारे,डॉ पवार,श्रीमती शस्त्रक्रियागृह विभाग प्रमुख श्रीमती साळवे , रक्तपेढी विभाग श्रीकृष्ण नागरगोजे श्री महादेव इंगळे,श्रीमती सोनवणे .श्रीमती गवळी, परमेश्वर राऊत, अमर वाघमारे आदींसह रुग्णालयातील सर्व डॉक्टर, कर्मचाऱ्यांच्या सेवेतून रुग्णांना आधार मिळत आहे.

स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया गाठ काढणे, हर्निया, हाडांच्या शस्त्रक्रिया अशा सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अविरतपणे केल्या जात आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना अशा विविध सुविधा मोफत उपलब्ध झाल्यामुळे त्यांना खाजगी रुग्णालयात जाण्याची गरज भासत नाही

### उपलब्ध सुविधा

एक्स-रे, सोनोग्राफी, सिटीस्कॅन, यासह डायलिसिस ची सुविधा नव्याने सुरू झालेली आहे यामुळे मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना उपचाराची सोय झाली आहे.

# पेट्रोल पंपांवर गर्दी कायम, प्रशासनाचे दावे फोल ठरले

**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई तालुक्यात इंधनटंचाईची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असून, पेट्रोल पंपांवरील नागरिकांची गर्दी काही केल्या कमी होताना दिसत नाही. पेट्रोल – डिझेलच्या तुटवड्यामुळे वाहनचालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे, तर अनेकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे.

अंबाजोगाई तालुका प्रशासनाने 'परिस्थिती नियंत्रणात येत असून लवकरच इंधन पुरवठा सुरळीत होईल' असे दावे केले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक पेट्रोल पंपांवर अजूनही ' पेट्रोल – डिझेल संपले आहे' अशी पाटी दिसत असल्याने अंबाजोगाईकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अंबाजोगाई शहरासह ग्रामीण भागातही हीच परिस्थिती असून काही ठिकाणी किरकोळ वादाचे प्रकारही समोर येत आहेत.

विशेष म्हणजे, काही पंप सुरू असले तरी तेथे प्रचंड गर्दी होत असल्याने व्यवस्थापन कोलमडल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे रोजच्या कामकाजावर परिणाम होत असून शेतकरी, कामगार आणि विद्यार्थ्यांना मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, इंधन पुरवठा सुरळीत करण्यासाठी कंपन्यांशी समन्वय सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. मात्र, जमिनीवरील परिस्थिती पाहता हे दावे फोल ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये पसरली आहे. नागरिकांनी संयम बाळगावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत असले तरी 'आधी इंधन उपलब्ध करून द्या' अशी मागणी अंबाजोगाईकरांकडून जोर धरत आहे. इंधनटंचाईचा प्रश्न तातडीने सोडवला नाही तर परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# चकलांबा पोलिसांची अवैध वाळू उत्खननावर मोठी कारवाई; पंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | गेवराई तालुक्यातील सुरळेगाव शिवारात गोदावरी नदीच्या पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध चकलांबा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी पंधरा लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गोदावरी नदीच्या पात्रातून विनापरवाना वाळूचे उत्खनन होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने सुरळेगाव शिवार परिसरात सापळा रचून धाड टाकली. यावेळी कोणत्याही प्रकारचा अधिकृत परवाना नसताना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैध वाळू उपसा करताना दोन ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त करण्यात आल्या. यामध्ये स्वराज्य कंपनीचा एक लाल रंगाचा ट्रॅक्टर आणि सोनालीका कंपनीचा निळ्या रंगाचा ट्रॅक्टर, अशा एकूण मोठ्या मुद्देमालाचा समावेश आहे.

या प्रकरणी पोलिसांनी अशोक आरबड, गोपाल आरबड, वनराज शिरसट, दगडू उर्फ शाम राऊत आणि विशाल चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींनी शासनाची फसवणूक करून बेकायदेशीररीत्या वाळू साठवून वाहतूक केल्याचे तपासात समोर आले आहे. चकलांबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये या कारवाईची नोंद करण्यात आली आहे.

# गेवराई नगर परिषदेने शहरातील नागरिकांना घरे दिल्याचे समाधान : माजी आ. अॅड. लक्ष्मण पवार

## शहरातील अतिक्रमित लाभार्थ्यांच्या पिटीआर वाटपाबाबत नप सभागृहात आढावा बैठक संपन्न

**गेवराई (प्रतिनिधी)** | गेवराई शहरातील अतिक्रमित लाभार्थ्यांना पिटीआर वाटप व त्यांना पंतप्रधान आवास योजनेतून पक्की घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. यावेळी शहरातील ४५१ लाभार्थ्यांची यादी तयार झालेली असून ती नगरपरिषदेच्या बैठकीत तात्काळ मंजूर करून अंतिम मंजुरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना माजी आ. पवार यांनी दिल्या.



बैठकीत बोलताना माजी आ. लक्ष्मण पवार म्हणाले की, शहरातील अतिक्रमित भागातील पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये असलेल्या त्रुटी तातडीने दूर करून त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा. यापूर्वी अतिक्रमण भागात उपलब्ध असलेल्या पिटीआरवर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनाकडे सादर करण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अतिक्रमित लाभार्थ्यांना पिटीआरसह पक्की घरे उपलब्ध करून देणे हेच आपले अंतिम ध्येय असून, ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी सर्व आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, मुख्याधिकारी व नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या बैठकीस मुख्याधिकारी विक्रम महाडूरके, नगरपरिषद उपाध्यक्ष भगवान घुंबार्डे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, उपाध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, माजी सभापती भरत गायकवाड, कृष्णा पाटोळे,

सभापती महेश सौंदरमल, सय्यद बदियोद्दीन, प्रशांत राख, ऍड. सोपान मडके, शेख शाहेदाद, सय्यद अय्युब,पिंटु साळवे, शेख मुददशीर, शौकत पठाण, दाऊद पठाण, आकेफ काझी, कृष्णा काकडे, विनायक गिरी, मतीन कुरेशी, नागेश पंडित,

लक्ष्मण चव्हाण, राम पवार, सालम चाऊस, ज्ञानेश्वर भाले, सज्जू बागवान, माऊली बेदरे,

यांच्यासह सर्व सन्माननीय नगरसेवक, माजी नगरसेवक, पदाधिकारी व नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

# क्रेडाईच्या वतीने कामगार कल्याण सप्ताहाचे आयोजन

**तभा. वृत्तसेवा**

**श्रमिक सन्मान** | आपले योगदान, आमचा अभिमान अंतर्गत विविध उपक्रम राबविणार - अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष संजय सुराणा

**अंबाजोगाई** | क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने बांधकाम कामगारांप्रती कृतज्ञता - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. श्रमिक सन्मान - आपले योगदान, आमचा अभिमान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. कामगार कल्याण सप्ताह साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम राबवला जात असून, यामध्ये बांधकाम कामगारांच्या आरोग्य, सुरक्षा आणि जीवनमानाचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आला आहे. याचा शुभारंभ मंगळवारी करण्यात आला असल्याची माहिती अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष संजय सुराणा व सचिव पवन भराडीया यांनी दिली आहे.




मंगळवार, दिनांक ५ मे रोजी क्रेडाई महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शाखेच्या वतीने कामगार कल्याण सप्ताहास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक रचना परदेशी तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक बप्पा सिरसाठ (धारूर), शुभम थोरवे (जेएसडब्ल्यु स्टीलचे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक), धनराज जाधव (कुबेर स्टील डेपोचे प्रमुख व्यवस्थापक), श्रीगोपाल लोहिया (लोहिया स्टील), सुरेश शेळके (चेअरमन, धनलक्ष्मी मल्टिस्टेट, धारूर), ज्येष्ठ समाजसेवक बाबुराव शिनगारे गुरूजी (व्यापारी संघ, धारूर), श्री.कळसकर साहेब (मोजणी अधिकारी), अभय भावठाणकर (उद्योजक), बंडू मुंडे (प्रगतशील शेतकरी), सौ.अनिताताई सुराणा (अध्यक्ष, सेवाभारती शिक्षण संस्था, लातूर) हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी ७० हून अधिक बांधकाम कामगार सहभागी झाले होते. या सर्व कामगारांना जेएसडब्ल्यु स्टीलकडून टी-शर्ट वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना शुभम थोरवे (जेएसडब्ल्यु स्टीलचे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक) यांनी सांगितले की, बांधकाम क्षेत्रात सातत्याने नवीन तंत्रज्ञान येत असून गुणवत्तापूर्ण कामासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज वाढत आहे.

बांधकाम क्षेत्राचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या कामगारांच्या कौशल्य विकासासाठी क्रेडाई महाराष्ट्रकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. कामगार कल्याण सप्ताहामुळे अंबाजोगाईच्या बांधकाम क्षेत्राला नवी दिशा मिळेल. प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता दूर होण्यास मदत होईल तसेच कामगारांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# चारचाकी वाहन चोरी करणारी टोळी जेरबंद

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | जिल्ह्यामध्ये वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम हाती घेतली असून यामध्ये मोठे यश आले आहे. पेठबीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या एका व्यावसायिक वाहनाचा छडा लावत पोलिसांनी लातूर येथील एका टोळीला जेरबंद केले आहे. या टोळीने अन्य एका ठिकाणाहून वाहन चोरी केल्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



पेठबीड येथील रहिवासी अश्पाक अनिमोद्दीन मोमीन यांनी त्यांचे अशोक लिलँड कंपनीचे वाहन बार्शीना परिसरातून अज्ञात चोरट्यांनी पळवून नेल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली होती. या तक्रारीनंतर पेठबीड पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली होती. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरु केला. गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित आरोपी लातूर येथील असल्याची खात्री पटल्यानंतर पोलीस पथकाने तातडीने लातूर गाठले.

लातूर येथील म्हाडा कॉलनी आणि अंबाजोगाई रोड परिसरात सापळा रचून तैबाज सलीम शेख आणि रेहान इलाही शेख या दोन तरुणांना पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी पेठबीड येथून वाहन चोरी केल्याचे मान्य केले. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीचा टेम्पो जप्त केला असून अधिक तपासात त्यांनी विवेकानंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून देखील एक पिकअप वाहन चोरल्याची कबुली दिली आहे. या कारवाईमुळे वाहन चोरणाऱ्या एका सक्रिय टोळीचा पर्दाफाश झाला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.